कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६

किंमत ४₹

## सपकाळ यांचा फडणवीसांना टोला

**मुंबई :** बारामती विधानसभेची पोटनिवडणूक जनभावना लक्षात घेऊन बिनविरोध व्हायला हवी, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान म्हणजे 'लोका सांगे ब्रम्हज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण' असे आहे, असा टोला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे. ते म्हणाले की, जी जनभावना आहे त्याकडे मुख्यमंत्रीच दुर्लक्ष करत आहेत. बारामतीत अजित पवार यांचा झालेला विमान अपघाताबाबत शंकेचे निरसन व्हावे ही महाराष्ट्राची खरी जनभावना आहे. विमान अपघात प्रश्नी एफआयआर दाखल करून ताबडतोब चौकशी करण्याचे कर्तव्य फडणवीस यांना करता आले असते, पण त्यांनी ते केलेले नाही, त्याकडे ते दुर्लक्ष करत आहेत.

## लाचखोर कर अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**रायगड :** नवी मुंबई येथील जीएसटी विभागातील लाचखोर व्यवसाय कर अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला. त्याला ९ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. ही लाच घेतल्याप्रकरणी त्याच्याविरोधात सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये एका महिलेचाही सहभाग असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमित गिरी (४५) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. हा कोकण भवन जीएसटी विभागात व्यवसाय पान २ वर



### वेधक

## पाणदिवे गावात १५ डेंग्यूचे रुग्ण

**उरण :** तालुक्यातील पाणदिवे गावात डेंग्यूचे १५ आढळून आले आहेत. हे रुग्ण येथील खासगी व सरकारी रुग्णालयात उपचार करुन घेत असून त्या रुग्णाच्या तब्येतीत सुधारणा होत आहे. दरम्यान, या आजारांचा अधिक प्रसार होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोलीच्यावतीने यासंदर्भात उपाय योजना तसेच जनजागृती करण्यात येत आहे. तरी नागरिकांनी आप आपल्या घरात साठवून ठेवले पाणी झाकून ठेवावे. तसेच, आपल्या घर परिसरात डासांची उत्पत्ती वाढणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन उरण तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी केले आहे.पावसाळा सुरु झाला कि विविध आजारांचे रुग्ण आढळून येतात. त्यामध्ये सर्दी, खोकला, ताप, डेंग्यू, मलेरिया आणि इतर पान २ वर

## नऊ पोलिसांना फाशीची शिक्षा

**मदुराई :** पोलिसांच्या छळामुळे बाप-लेकाचा मृत्यू झाल्याची घटना सहा वर्षांपूर्वी तामिळनाडू येथे घडली होती. या प्रकरणात मदुराईच्या विशेष कोर्टाने पोलीस कर्मचाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. ही घटना १९ जून २०२० रोजी घडली होती. साथानकुलम येथे पी. जयराज आणि त्यांचा मुलगा जे. बेनिक्स यांचे मोबाईलचे दुकान होते. कोरोनात लॉकडाऊनचे नियम मोडून दुकान जास्त वेळ उघडे ठेवल्याच्या आरोपावरून पोलिसांनी त्यांना अटक करून अमानूष छळ करत मारहाण केली. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, दोघांचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. सीबीआयने याप्रकरणी १० पोलीस कर्मचाऱ्यांना अटक केली होती. त्यातील एका आरोपीचा कोरोनामुळे मृत्यू झालेला होता.

## एअर इंडिया तिकिटात भाडेवाढ

**नवी दिल्ली :** युद्ध जन्य असल्यामुळे जागतिक पातळीवर जेट इंधनाच्या किंमतींमध्ये झालेल्या प्रचंड वाढीचा परिणाम आता भारतीय विमान प्रवाशांवरही दिसून येत आहे. एअर इंडिया कंपनीने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी इंधन अधिभारात सुधारणा केल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे प्रवाशांना विमान तिकिटांसाठी अतिरिक्त रक्कम मोजावी लागणार असून, विशेषतः परदेशी प्रवास करणाऱ्यांवर याचा जास्त भार पडणार आहे. ० ते ५०० कि.मी. अंतराच्या छोट्या मार्गांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रति सेक्टर अतिरिक्त २९९ रुपये मोजावे लागतील. तर २,००० कि.मी.पेक्षा जास्त मार्गांवर हे शुल्क ८९९ रुपयांपर्यंत जाऊ शकते.

## ९१ लाख मतदारांची नावे काढली

**कोलकाता :** निवडणूक आयोगाने देशातील २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत एसआयआर मोहिम राबवली आहे. मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी केली जात आहे. सध्या निवडणूक होत असलेल्या राज्यातही ही मोहीम राबवली गेली. त्यामुळे अनेक राज्यांत मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्यात आल्यानंतर मोठ्या प्रमाणावर मतदार कमी झाले आहेत. पश्चिम बंगालमध्ये अंतिम मतदार यादी जारी करण्यात आली असून त्यातून तब्बल ९१ लाख मतदार कमी करण्यात आले आहेत.

# सभेत गदारोळ

**|| अध्यक्षांचा सभागृहात नियंत्रणाचा अभाव || जिल्हा परिषद सभा की गाव सभा असल्याची चर्चा**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

जिल्हा परिषदेची पहिलीच सभा गदारोळात पार पडली. सभेदरम्यान विविध मुद्द्यांवरून सदस्यांमध्ये चर्चा झाली. बहुतांश सदस्य हे नव्याने निवडून आलेले असल्याने त्यांना कामकाजाच्या पद्धतीची पुरेशी माहिती नसल्याचे स्पष्टपणे दिसून आले. नियमांची अपुरी माहिती, अनुभवाचा अभाव, यामुळे गोंधळ अधिक वाढल्याचे दिसून आले. अध्यक्षांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. या घटनेमुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या सुरळीतेबाबत प्रश्न उपस्थित होत सून नव्या सदस्यांना प्रशिक्षणाची गरज असल्याचे चर्चा सुरु झाली आहे.

केंद्र प्रमुखांकडे गट शिक्षणाधिकाऱ्याचा कारभार, मोर्बा धरणातील पाणी २३ गावांना मिळावे, प्राथमिक आरोग्य केंद्राची पडझड, शिक्षकांची रिक्त पदे, रेबीजसह इतर लसी व औषधे उपलब्ध करणे, पाणी, आरोग्य, शिक्षण अशा विविध प्रश्नांवर जिल्हा परिषदेची सभा गाजली. लिहून आणलेले आपले प्रश्न वाचून दाखविण्यासाठी अनेकजण पुढे-पुढे करीत होते. यावेळी एकमेकांमध्ये स्पर्धा झाली. त्यावेळी जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेत सदस्यांचा गदारोळ संपुर्ण सभागृहाने पाहिला. यावेळी अध्यक्षाचा सभागृहात नियंत्रणाचा अभाव दिसून आला. जिल्हा परिषदेची सभा की, गाव सभा, अशी ही चर्चा सभागृहात अनेकजण दबक्या आवाजात करीत होते. ही सभा उपाध्यक्ष आणि कृषी सभापतीच चालवित असल्याने वेगवेगळ्या पान २ वर





### शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर वैकुंठ पाटील यांची सारवा सारव

अटल बिहारी वाजपेयी शिवडी- न्हावा शेवा अटल सेतू प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रासाठी नियुक्त नव नगर, विकास प्राधिकरण, क्षेत्रात तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विकास प्रकल्पासाठी भूसंपादन व भू वाटप करण्याच्या अनुषंगाने भुसंपादन व भुवाटप धोरण लागू करण्यास मान्यता देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयावर चर्चा करीत असताना उरणमधील काँग्रेसचे जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनिष पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवून शासन निर्णयाला स्थगितीचा ठराव घेण्यात यावा, अशी मागणी सभागृहात केली. यावर भाजपचे वैकुंठ पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सारवा सारव करून हा प्रश्न दाबण्याचा प्रयत्न केला. परंतु, पुढील बैठकीत हा विषय चर्चेत घेण्यात यावा असे सदस्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याची बाब सभागृहात पाटील यांनी दाखवून दिली.

### विविध पदांच्या सभापतींची निवड

रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्याकडे आरोग्य व बांधकाम विभागाची धुरा सभापती म्हणून सोपविण्यात आली असून वित्त व शिक्षण सभापती म्हणून चंद्रकांत कळंबे आणि कृषी व पशुसंवर्धन सभापती म्हणून वैकुंठ पाटील यांची निवड करण्यात आली.

### वैकुंठ पाटीलांचा खेळ निष्फळ

जिल्हा परिषदेच्या सत्ता स्थापनेत वैकुंठ पाटील यांची राजकीय खेळी निष्फळ ठरली आहे. अध्यक्षपद मिळण्याची आशा आधीच मावळल्यानंतर त्यांनी अर्थ व बांधकाम सभापतीपद मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले होते. मान्यवर नेत्यांची मदत घेत त्यांनी पडद्यामागे हालचाली केल्या, मात्र शेवटच्या क्षणी समीकरणे बदलली आणि हे पद त्यांच्या हातातून निसटले. या घडामोडींमुळे पाटील यांना धक्का बसला आहे. अखेरीस त्यांना कृषी व पशुसंवर्धन सभापतीपद स्विकारावे लागले. अपेक्षेपेक्षा कमी महत्वाच्या या पदावर समाधान मानावे लागल्याने त्यांच्या समर्थकांमध्येही नाराजीचे वातावरण आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेत सत्तेच्या वाटपात शेवटपर्यंत रंगलेल्या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. पाटील यांची पुढील राजकीय वाटचाल कशी राहणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मंगळवारी (दि.७) झालेल्या सर्वसाधारण सभेत अर्थ सभापती पद चंद्रकात कळंबे यांच्याकडे देण्यात आले असून वैकुंठ पाटील यांना कृषी व पशुसंवर्धन सभापती पदावर समाधान मानावे लागले.

# २ कोटींची उपकरणे गायब

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील आरसीएफ कंपनीच्या सीएसआर खर्चामध्ये जिल्हा रूग्णालयासाठी दिलेल्या २ कोटी ६ लाख रुपयांच्या सीएसआर निधी बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. कंपनीने आपल्या २०२२-२३ च्या वार्षिक अहवालात अलिबाग जिल्हा रुग्णालयासाठी वैद्यकीय उपकरणे खरेदीवर १ कोटी ३१ लाख ९ हजार रुपये खर्च केल्याचा मोठा दावा केला आहे. तसेच, २०२०-२१ मध्ये वैद्यकीय उपकरणे पुरविण्यासाठी ७५ लाख रुपये दिल्याचाही उल्लेख आहे. मात्र, माहिती अधिकार कार्यकर्ता संजय सावंत यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितलेल्या माहितीत जिल्हा रुग्णालयाने स्पष्टपणे सांगितले आहे की, आरसीएफकडून कोणतीही वैद्यकीय उपकरणे किंवा निधी प्राप्त झालेला नाही. आरसीएफ कंपनीचा अधिकृत दावा आणि जिल्हा रुग्णालयाचे लेखी उत्तर, यातील ही गंभीर विसंगती आता मोठ्या घोटाळ्याकडे बोट



**■ जिल्हा रुग्णालयाचा धक्कादायक खुलासा**

**■ आरसीएफने दिलेली वैद्यकीय उपकरणे मिळालीच नाहीत**

दाखवित असल्याचा दावा सावंत यांनी केला आहे.

संजय सावंत यांनी आरसीएफ कंपनीच्या ४५ व्या अधिकृत वार्षिक अहवालाचा २०२२-२३ हवाला दिला आहे. या अहवालातील पृष्ठ क्रमांक ३१ आणि ३२ वर अलिबाग येथील जिल्हा रूग्णालयासाठी वैदयकीय उपकरणे पुरविणे या प्रकल्पाखाली कंपनीने १ कोटी ३१ लाख रुपये इतका खर्च दाखवला आहे. तसेच, २०२०-२१ मध्ये वैद्यकीय उपकरणे पुरविण्यासाठी ७५ लाख रुपये दिल्याचाही उल्लेख आहे. अशा प्रकारे २ कोटी ६ लाख रूपये आरसीएफ कंपनीने जिल्हा रूग्णालयास दिले असल्याचा त्यांच्या सीएसआर अहवाल दर्शवित कंपनीने हा खर्च थेट केल्याचे नमूद केले आहे. संजय सावंत यांनी २० डिसेंबर २०२५ रोजी अलिबाग जिल्हा रुग्णालयाकडे पान २ वर

## उरण शहर मृत्यूच्या सावलीत

**धोकादायक इमारती जमीनदोस्त करण्याची मागणी**



**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहरातील नागरिक अक्षरशः मृत्यूच्या सावलीत जगत असताना, प्रशासन मात्र 'बघून कारवाई करतो' या गुळगुळीत उत्तराने वेळ मारून नेत असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. धोकादायक इमारतींबाबत वारंवार विचारणा करूनही अधिकारी वर्ग केवळ आश्वासनांची धूळफेक करत असल्याचे चित्र आहे. या अधिकाऱ्यांना फक्त ३ वर्षे नोकरी करून बदली करून जायचे असल्याने जनतेच्या जीविताचे काहीही देणंघेणं उरलेले नाही, असा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनावरील विश्वास ढासळताना दिसत आहे.

उरण शहरातील अनेक इमारतींची अवस्था पान २ वर

## मेट्रो लाईन-९चा पहिला टप्पा सुरू

**मुंबई :** दहिसर पूर्व ते काशीगाव या ४.७ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेवर चार स्थानकांसह सोमवार पासून मेट्रो सेवा सुरू झाली आहे. त्यामुळे मुंबई आणि मीरा-भाईंदर हा प्रवास जलद होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो लाईन-९ च्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मंत्री मंगल प्रभात लोढा, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या महापौर रितू तावडे, आ. प्रवीण दरेकर, आ. संजय उपाध्याय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.

# अनधिकृत आरएमसीचा कहर

**प्रशासन गप्प, नागरिकांच्या जीवाशी खेळ**

**| रेवदंडा | निलेश फुंडे |**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील चौल-रेवदंडा बायपासवरील (रेडी मिक्स काँक्रीट) प्लांटमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सिमेंटची धूळ, वायू-ध्वनी प्रदूषण आणि जड वाहनांच्या वर्दळीमुळे श्वसनाचे विकार, सिलिकोसिस, डोळ्यांची जळजळ, त्वचेचे आजार वाढत आहेत. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांना त्रास होत आहे. या अनधिकृत प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. परिणामी, जनजीवन त्रस्त झाले असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याची टीका होत आहे. प्लांटमधून उडणारी सिमेंट धूळ मोठ्या प्रमाणात परिसरात साचत असून, ती थेट नागरिकांच्या श्वसनमार्गात जात आहे. त्यामुळे दमा, खोकला, श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ पान २ वर





> कांदळवन नष्ट होत आहे. हवा विषारी होत आहे. केंद्र-राज्य शासन, जागे व्हा! शासनाची परवानगी नसेल तर अशा प्लांट्सवर छापा मारून कारवाई करा. अन्यथा जनआंदोलन उभे राहील.
> – आशिष पेणकर, सामाजिक कार्यकर्ते

### नियमांचे उल्लंघन

या प्रकल्पाला कोणतीही परवानगी नसल्याचे बोलले जात आहे. असे असेल तर पर्यावरणीय नियमांचे उघड उल्लंघन होत असताना संबंधित यंत्रणा गप्प का आहे, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. चौल-रेवदंडा बायपाससाठी एमएसआरडीसीकडून निविदा काढण्यात आली असून त्यात आरएमसीसाठी उभारण्यात आलेल्या प्लांटसाठी रायगड जिल्हाधिकारी, ग्रामपंचायत किंवा प्रदूषण नियंत्रण मंडळाची लेखी परवानगी नसल्याचे समोर आले आहे.

## चाणजे घोटाळा दडपण्याचा प्रयत्न

**| उरण | प्रतिनिधी |**

चाणजे ग्रामपंचायतीतील कथित कोट्यवधींच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, चौकशीच्या नावाखाली संपूर्ण प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संतप्त आरोप केला जात आहे. वारंवार तक्रारी करूनही उरण पंचायत समितीच्या अधिकारी वर्गाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने जनतेत तीव्र नाराजी पसरली आहे. घनःश्याम कडू यांच्या तक्रारीनुसार, २०१५ ते २०२४ या कालावधीत ग्रामनिधी व पाणीपट्टीच्या वसुलीतील लाखो-कोट्यवधी रुपयांचा निधी बँकेत न भरता थेट खर्च करण्यात आला. अनेक ग्रामविकास पान २ वर

## राणेंच्या स्वागतासाठी कचऱ्यावर पडदा



**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग-आक्षी मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचा ढिगारा आहे. या कांदळवनातील कचऱ्याकडे वन विभागाचे दुर्लक्ष असल्याने हा रस्ता कचऱ्याने भरला आहे. मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांचे बुधवारी (दि.८) आक्षी-साखरमध्ये आगमन होणार आहे. त्यांना हा ढिगारा दिसू नये म्हणून या कचऱ्यावर पडदा टाकण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील रेवदंडा, नागाव, आक्षी ही पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची ठिकाणे आहेत. या ठिकाणी पर्यटकांची वर्दळ कायमच आहे. अलिबागहून रेवदंडा, आक्षी, नागावकडे जाणाऱ्या पर्यटकांना आक्षी पुलाजवळील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या कचऱ्याशी कायमच सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुतर्फा ठिकठिकाणी कचर पडलेला आहे. प्रवासी वर्गाला अनेक वेळा नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याच्या बाजूला असलेल्या कांदळवनात कचऱ्यांचा ढिगारा पडलेला असतानाही वन विभागाकडून कोणत्याही पान २ वर

**विकास कागदावरच | दोन्ही जिल्ह्यांतील प्रशासनातील समन्वयाचा अभाव**

# दिघी-पुणे पर्यायी रस्ता रखडला

**| सलीम शेख |**
**| माणगाव |**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला नवे पंख देणारा दिघी-पुणे पर्यायी मार्ग सध्या केवळ समन्वयाअभावी अडलेला स्वप्नमार्ग ठरला आहे. श्रीवर्धन जवळील दिघी बंदर ते पुणे या अंतराला गती देणारा, वेळ व खर्चाची मोठी बचत करणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केवळ ६ ते ७ किमी अपूर्ण रस्त्यामुळे रखडल्याचे वास्तव समोर आले आहे. दोन जिल्ह्यांच्या सीमा रेषेवर उभा असलेला हा अपूर्ण टप्पा म्हणजे विकासाच्या महामार्गातील 'बॉटलनेक' ठरत असून, रायगड आणि पुणे प्रशासनातील समन्वयाचा अभाव या प्रकल्पाच्या गतीला निर्णायक अडथळा ठरत आहे.

दिघी-पुणे या नव्या मार्गामुळे सुमारे २५ ते ३० किमी अंतर कमी होणार आहे. त्यामुळे पर्यटक, नागरिक व प्रवाशांना पश्चिम महाराष्ट्र पुणे ते रायगड हे अंतर कमी वेळेचे व सुलभ प्रवासासाठी राहणार आहे. हा प्रवास सुलभ करण्यासाठी दोन पर्यायी मार्ग प्रस्तावित करण्यात येत आहेत. पहिल्या पर्यायात मुळशी, वाघेवाडी व ताम्हिणी परिसरात पूल व बोगदा उभारण्याचा प्रस्ताव आहे. दुसरा आणि अधिक प्रभावी पर्याय म्हणजे माणगाव, बोरवाडी, पानशेत, पुणे हा मार्ग पूर्ण झाल्यास तब्बल २५ ते ३० किमी अंतर कमी होऊन प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि किफायतशीर पान २ वर





> नवीन मार्गामुळे श्रीवर्धन, महाड आणि दक्षिण कोकणातील पर्यटनाला नवी दिशा मिळेल. तर, कुंभे-पानशेत परिसर पर्यटन केंद्र म्हणून नव्याने उदयास येण्याची शक्यता आहे. सुरक्षित आणि कमी वेळेत होणारा प्रवास पर्यटकासाठी आकर्षण ठरणार असून दोन जिल्ह्यातील आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. केवळ ७ किमीचा दुवा पूर्ण झाला तर दिघीपुणे पर्यायी मार्ग हा कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाचा खरा गेमचेंजर ठरू शकतो.
> – पंकज तांबे, जिल्हा उपाध्यक्ष, काँग्रेस

**झेरॉक्स सेंटरमध्ये कामासाठी जागा भरणे आहे**

**उमेदवार - महिला**
**शिक्षण - १२ वी पास**
**आकर्षक पगार**

संपर्क - सुखसागर भवन दुसरा माळा, BVM टॉकीजच्या मागे, अलिबाग, रायगड ४०२ २०१

**महेश भोसले : 8483999229**

# अवैध वाळू उपशामुळे नुकसान



(छायाचित्र: शैलेश पालकर)

## ●‘आमची माती आमची माणसं’ आक्रमक

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**पोलादपूर तालुक्यातील अवैध वाळू उपशामुळे केवळ निसर्गाचीच नव्हे तर नद्यांच्या पात्रामध्ये असलेल्या पुल साकव आणि बंधाऱ्यांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वाळू उपशामुळेच तालुक्यावर पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. त्यामुळे वाळू उपसा करताना नियमांचे काटेकोर करा; निसर्गाचा ऱ्हास होणार नाही याचीही दक्षता घ्यावी, असे आवाहन आमची माती आमची माणसं सामाजिक संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांनी केले आहे.**

पोलादपूर तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे निसर्गाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. या पार्श्वभूमीवर आपली माती आपली माणसं सामाजिक संघटना आक्रमक झाली असून संघटनेच्या पुढाकाराने तहसीलदार व वाळू व्यावसायिक यांची संयुक्त बैठक तहसिल कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी संस्थापक राज पार्टे आक्रमकपणे बोलत होते. या बैठकीला तहसीलदार कपिल घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, संघटनेचे संस्थापक राज पार्टे, अध्यक्ष निलेश कोळसकर, रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य निलेश कुंभार, वाळू उपसा संघटनेचे प्रमुख काशिनाथ कुंभार व सहकारी तसेच वैभव चांदे, शैलेश सलागरे, लक्ष्मणबुवा खेडेकर आणि मुंबई व ग्रामीण कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी राज पार्टे यांनी, पोलादपूर तालुक्याचे तापमान वाढण्याचे कारणही वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर होत असल्याकडे लक्ष वेधले. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार महसूल भरूनच वाळू उपसा करावा. तसेच, आतापर्यंत अधिकृत परवानगी घेऊन वाळू काढणाऱ्यांची यादी सादर करावी, अशी मागणीही त्यांनी केली. तहसिलदार कपिल घोरपडे यांनी, शासनाच्या गौण खनिज उत्खननासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देत बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला. यावेळी स्थानिक नागरिकांना घरकुलासाठी पाच ब्रास वाळू मोफत मिळणार असून ती स्वत:च्या खर्चाने काढण्यास परवानगी असेल, असेही कपिल घोरपडे यांनी सांगितले. त्यासाठी पंचायत समितीकडून घरकुल यादी घेऊन योग्य ठिकाण निश्चित केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा संताप उसळला



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील धामणी परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांचा रोजगारासाठीचा संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे. सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वी स्थानिकांना रोजगार मिळावा या अपेक्षेने शेतकऱ्यांनी आपली जमीन कवडीमोल भावात कंपनीला विकली होती. मात्र, आजतागायत त्याठिकाणी कोणताही ठोस प्रकल्प उभारला गेला नसल्याने भूमिहीन झालेल्या शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

धामणी परिसरातील स्थनिकांनी विकलेल्या या जागा पुढे आशापुरा फुड्स प्रा.लि. या कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली. मात्र, स्थानिकांना रोजगार देण्याचे आश्वासन पूर्ण न करता बाहेरील ठेकेदारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त युवक-युवती रोजगारापासून वंचित राहिले असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. याशिवाय, स्थानिकांवर दबाव आणण्यासाठी काही राजकीय मंडळींना हाताशी धरून प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात पिंगळे व साबळे कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच तहसीलदार कार्यालयात निवेदने दिली आहेत. अनेक बैठका होऊनही वर्ष उलटून गेले, तरी कोणतीही ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# एचपीव्ही लस अत्यंत महत्त्वाची

## ●डॉ. बाळासो काळेल यांचे प्रतिपादन

**। उरण । प्रतिनिधी ।**

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी एचपीव्ही लस अत्यंत महत्त्वाची ठरत असल्याचे प्रतिपादन उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासो काळेल यांनी केले आहे. योग्य वयात घेतलेली ही लस भविष्यात गंभीर आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करू शकते, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या उपस्थितीत नगरपालिकेच्या कार्यालयात आयोजित बैठकीत डॉ. काळेल यांनी या लसीकरणाबाबत सविस्तर माहिती दिली.

सध्या उरण शहरात विशेष एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून पात्र मुलींना मोफत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेत १४ वर्षे पूर्ण झालेल्या पण १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींचा समावेश करण्यात आला आहे. डॉ. काळेल यांनी स्पष्ट केले की, एचपीव्ही संसर्ग हा गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण असून या संसर्गापासून बचाव करण्यासाठी लसीकरण अत्यावश्यक आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षित असून भविष्यातील आरोग्यदृष्ट्या ती प्रभावी संरक्षण देते. एचपीव्ही लसीकरणाबाबत भीती किंवा चुकीची माहिती पसरलेली आहे. मात्र, ही लस वैज्ञानिकदृष्ट्या सुरक्षित असून योग्य वयात घेतल्यास कर्करोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. त्यामुळे पालकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता मुलींच्या आरोग्यासाठी लसीकरणाला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

# उरणमध्ये थंड पेयांचा धोका

## ● शीतपेयांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

**। उरण । प्रतिनिधी ।**

एप्रिलच्या वाढत्या उकाड्यामुळे उरण तालुक्यात शीतपेय विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लिंबूपाणी, सरबत, ताक, लस्सी आणि फ्रूट सॅलडसारख्या पेयांकडे नागरिकांचा ओढा वाढत असला, तरी या पेयांच्या दर्जाबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहेत.



रस्त्यावर विक्री होणाऱ्या बहुतांश शीतपेयांमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे चित्र दिसून येत आहे. ताक व लस्सी तयार करताना वापरले जाणारे दूध, दही व पाणी यांची गुणवत्ता तपासली जात नसल्याने आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. तसेच, अनेक ठिकाणी वापरला जाणारा बर्फ हा अनधिकृत कारखान्यांमधून आणला जात असल्याची बाबही समोर आली आहे. काही विक्रेत्यांकडून सरबतामध्ये कृत्रिम रंग व स्वाद मिसळले जात असल्याचे आढळून आले आहे. तर, फळांच्या नावाखाली विकले जाणारे फ्रूट सॅलड हे जुन्या फळांपासून बनवले जात असल्याचे आरोग्य विभागाच्या निरीक्षणात आले आहे. त्यामुळे अतिसार, पोटदुखी, टायफॉईडसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना घरगुती किंवा विश्वासार्ह ठिकाणचीच पेय पिण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, स्थानिक प्रशासनाने फेरीवाल्यांवर नियमित तपासणी करून स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे लागू करावेत, अशी मागणीही होत आहे. उष्णतेपासून दिलासा देणारी ही पेयेच, निष्काळजीपणामुळे आजाराचे कारण ठरू नयेत, यासाठी प्रशासन आणि नागरिक दोघांनीही सजग राहणे आवश्यक आहे.

# मोर्बे शाळेला राज्यस्तरीय पुरस्कार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

रा.जि.प. उच्च प्राथमिक मोर्बे या शाळेला ध्येय एज्युकेशन फाऊंडेशनच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने गौरविण्यात आले. लोकसहभागातून व शिक्षकांच्या कल्पकतेतून अनेक वेगवेगळे उपक्रम राबवून भौतिक सुविधांनी शाळा सुसज्ज व सुंदर, गुणवत्तापूर्ण बनवली आहे. शाळेतील विद्यार्थी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये पात्र झाली आहेत. शाळेत शिक्षक वर्षभर वेगवेगळे कल्पक उपक्रम राबवत असतात, शाळा संपूर्णतः डिजिटल झालेली आहे व या शाळेतील विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन परिपूर्ण पद्धतीने तयार होतात. या सर्व मेहनती मागे शाळेतील शिक्षकांबरोबरच एसएमसी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची महत्त्वाची भूमिका आहे.

# सीडीपीच्या जोरावर पनवेलचा विकास वेगात

## ● सहा वर्षांत १९०० कोटींची कामे पूर्ण

**। पनवेल । ग्रामीण प्रतिनिधी ।**

पनवेल शहराचा वाढता व्याप आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेली ओळख लक्षात घेता महापालिकेने शहर विकास आराखड्यानुसार (सीडीपी) मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला आहे. गेल्या ६ वर्षांत सुमारे १,९०० कोटी रुपयांची विकासकामे पूर्ण करण्यात आली असून, एकूण नियोजित कामांपैकी ४० टक्के उद्दिष्ट पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली.

२०१९ साली तयार करण्यात आलेल्या २० वर्षांच्या सीडीपी अंतर्गत सुमारे ४,५०८ कोटी रुपयांची विकासकामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी आतापर्यंत १,९२२ कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामांची अंमलबजावणी सुरू आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे वाढणारी वर्दळ लक्षात घेता हा आराखडा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. महापालिका क्षेत्रातील २९ गावे आणि सिडकोच्या सात वसाहतींना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. घनकचरा व्यवस्थापनासाठी सर्वाधिक ६३७ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला असून, रस्ते विकासासाठी ४९९ कोटी, पाणीपुरवठ्यासाठी २८५ कोटी आणि पथदिव्यांसाठी २१३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. याशिवाय मलनिसारण, पावसाळी गटारे, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातही कामे सुरू आहेत.

पान १ वरून

## लाचखोर कर अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

कर अधिकारी म्हणून कार्यरत आहे. तक्रारदार यांचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटचा व्यवसाय आहे. त्यांना पीटीईसी आणि पीटीआरसी संदर्भात जीएसटी विभागातून अमित गिरी यांच्या मेल वरून कारणे दाखवा नोटीस बजवण्यात आली होती. याबाबत गिरी यांना भेटण्यासाठी तक्रारदार त्यांच्या कार्यालयात गेले. गिरी यांनी कार्यालयातील वैशाली कदम नावाच्या महिलेला भेटण्यास सांगितले. त्यांनी कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना २३ हजार रुपयांची रक्कम भरावी लागणार, असे सांगितले. त्यापैकी १३ हजार रुपयांची पावती व १० हजार रुपये फाईल बंद करण्यासाठी वरिष्ठांना द्यावे लागतील, असे सांगितले. याबाबत तक्रारदार यांनी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून पडताळणी केली. त्यानुसार सोमवारी (दि ६) सायंकाळी सापळा रचण्यात आला. या सापळ्यात ९ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यातील २ हजार रुपये वैशाली कदम आणि ७ हजार रुपयांची लाच कर अधिकारी अमित गिरी यांनी स्विकारल्याचे दिसून आले. ही कारवाई सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## २ कोटींची उपकरणे गायब

आरटीआय अर्ज दाखल केला होता. त्यांनी सन २०१७-१८ ते सन २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत आरसीएफच्या सीएसआर निधीतून कोणती उपकरणे दिली, त्यांची सध्याची स्थिती, किती उपकरणे नादुरुस्त आहेत, दुरुस्ती झाली का, आणि उपकरणे पुरवठादार कोण आहे, याबाबत माहिती मागवली होती. या अर्जावर १६ मार्च रोजी जिल्हा रुग्णालयाचे जनमाहिती अधिकारी डॉ. प्रवीण केंदाडे यांनी लेखी उत्तर दिले आहे. रुग्णालयाने स्पष्ट केले की, सावंत यांनी जी माहिती मागविली आहे ती निरंक माहिती आहे. म्हणजेच, आरसीएफकडून एकही उपकरण किंवा निधी आलेले नाही. रुग्णालयाने ही बाब लेखी उत्तरात नमूद केल्याने आरसीएफचा २ कोटी ६ लाख रुपये खर्च केल्याचा दावा धुळीस मिळाला आहे, अशी टिका सावंत यांनी केली आहे.

ही विसंगती अत्यंत गंभीर आहे. आरसीएफ ही केंद्र सरकारची कंपनी असून त्यांचा सीएसआर निधी जनतेचा पैसा आहे. कंपनीने अहवालात खर्च दाखवला, परंतु रुग्णालयात प्रत्यक्षात काहीच पोहोचले नाही तर हा निधी कुठे गेला? उपकरणे पुरवठादार कोण? दुरुस्ती झाली का? याबाबत कंपनीच्या प्रतिनीधीकडे विचारणा केली असता जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे यांनी आरसीएफने जे साहित्य सीएसआरव्दारे विविध संस्थांना पुरविले आहे त्यांचे अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत, असे स्पष्टीकरण दिले. कंपनी आणि जिल्हा रुग्णालय यांच्या माहितीत विसंगती असल्यामुळे या प्रकरणाची सीबीआय, सीएजी तसेच राज्य शासनाने सखोल चौकशी करावी, अशी मागणी सावंत यांनी केली आहे.

## उरण शहर मृत्यूच्या सावलीत

इतकी बिकट झाली आहे की, त्या कधीही कोसळण्याच्या उंबरठ्यावर आहेत. काही ठिकाणी वरचे मजले पाडून इमारत जैसे थे ठेवून खाली दुकाने सुरू आहेत, तर काही ठिकाणी नव्याने बांधकाम सुरू असल्याचे चित्र आहे. यापेक्षा धक्कादायक बाब म्हणजे, धोकादायक घोषित इमारतींमध्येही खुलेआम व्यवसाय सुरू असून नागरिकांचा जीव अक्षरशः धोक्यात घालण्यात येत आहे. उरण नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी वर्गाने पूर्णपणे कानाडोळा केल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. एखादी दुर्घटना घडली आणि जीवितहानी झाली, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही नगरपालिकेच्या बांधकाम विभागावरच राहील, असा इशारा जनतेकडून देण्यात येत आहे.

कोटनाका येथील मासळी मार्केट परिसरात तर परिस्थिती अधिकच भीषण आहे. येथे प्रचंड वर्दळ असताना, इमारतींच्या वरच्या मजल्यावर मोठ्या भेगा पडल्या असून त्या कधीही कोसळू शकतात. खाली मात्र मासळी विक्रेते आणि ग्राहकांची गर्दी कायम असते. अशा परिस्थितीत प्रशासनाचे मौन हे जीवाशी खेळ असल्याचे बोलले जात आहे. वीर सावरकर मैदानाजवळील मोक्याच्या जागेवरील इमारतींची अवस्था देखील तितकीच गंभीर आहे. याशिवाय, शहरात अनधिकृत बांधकामांचा महापूर आला असून, या सगळ्या प्रकारात अधिकारी वर्गानेच आपले उखळ पांढरे करून घेतल्याची धक्कादायक चर्चा रंगू लागली आहे. या सगळ्या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी आता थेट लोकप्रतिनिधींनाच आवाहन केले आहे. नगराध्यक्षा भावना घाणेकर आणि उपनगराध्यक्ष तथा बांधकाम सभापती यांनी स्वतः शहरातील धोकादायक इमारतींची तात्काळ पाहणी करून, जनतेच्या जीविताच्या दृष्टीने त्या पावसाळ्यापूर्वी जमीनदोस्त करण्याची ठोस कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## सभेत गदारोळ

प्रकारच्या चर्चेला उधाण आले. प्रदिर्घ कालावधीनंतर रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक झाली. या निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात मंगळवारी (दि.७) दुपारी झाली. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली.

या सभेमध्ये सुरुवातीला वित्त, आरोग्य, शिक्षण, कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या सभापती पदाची निवड करण्यात आली. मंगेश वाकडीकर यांनी या पदांची निवड जाहीर केली. या निवडीनंतर राष्ट्रवादीच्या जिल्हा परिषद सदस्य गिता जाधव यांनी आपल्या शैलीने या सभापती निवडीबाबत अभिनंदन करीत असताना अर्थ व बांधकाम सभापती पद मिळण्याची आशा काहींना होती. अनेकांनी बॅनरही लावले होते. परंतु, ते पद मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी योग्य तो पदाला न्याय द्यावा, असा चिमटा काढत सांगितले.

आयत्यावेळच्या विषयामध्ये शिक्षण या विषयावर सभा गाजली. जिल्हा परिषद शाळांमधील कमी पटसंख्या, विस्तार आणि केंद्र प्रमुखांकडे गट शिक्षणाधिकारी पदाची धुरा, रिक्त असलेली शिक्षकांची पदे, बंद पडलेल्या शाळा अंगणवाडीसाठी देणे, तसेच जलजीवन मिशन योजनेची अपुर्ण कामांमुळे गावागावात निर्माण झालेली पाणी टंचाई, ठेकेदार व अधिकारी यांनी संगमनताने केलेला भ्रष्टाचार अशा अनेक विषयांवर सदस्यांनी आपले प्रश्न मांडले. मात्र, प्रश्न मांडत असताना मोजकेच सदस्य वगळता अन्य सदस्यांमध्ये प्रश्न मांडण्यासाठी प्रचंड गदारोळ सुरु झाली होती. जिल्हा परिषदेची सभा आहे, की गाव सभा, अशी चर्चा या सभागृहात उपस्थितांमध्ये दबक्या आवाजात सुरु झाली. जणू काही एकमेकांची बोलण्यासाठी स्पर्धाच सुरु असल्याचे दिसून आले. आपल्या मतदार संघातील बाजू मांडताना कोणत्याही सदस्यांना ताळमेळ दिसून आला नाही. एकमेकांशी बोलण्यावरून वाद घातल असल्याचे संपुर्ण सभागृहाने पाहिले. जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ सुरु झाला आहे. एका बाजूला महिला सक्षमीकरणासाठी कार्यक्रम घेत असताना दुसऱ्या बाजूला घर आणि पाणी यातच महिलांचे जग सध्या सुरु आहे, अशी चिंता काही सदस्यांनी व्यक्त केली. बंद असलेल्या प्राथमिक शाळांमध्ये अंगणवाडी सुरु करण्यात यावी, शिक्षक नसल्याने शाळा बंद झाली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होणे, जिल्हापरिषद शाळांची दुरुस्ती, टँकरमुक्त रायगडसाठी प्रयत्न करणे, शिक्षक समाजयोजन, अपुरे शिक्षक, घसरती पटसंख्या, जलजीवन योजनेची अपुरी कामे, जिल्ह्यात पाण्यासाठी होणारी गावे, वाड्यांमधील नागरिकांची होणारी वणवण, आधुनिक शिक्षणाची कमतरता, जिल्हा परिषद व्यवस्थेचे अपयश, अशा अनेक मुद्द्यांवर सभा गाजली. यावेळी शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करून सदस्यांनी त्यांना धारेवर धरले.

## राणेंच्या स्वागतासाठी कचऱ्यावर पडदा

प्रकारची दखल घेतली जात नाही. वेगवेगळ्या संस्था, संघटनांकडून कचऱ्याबाबत निवेदन देण्यात आले आहे. परंतु, कार्यवाही दिसून आली नाही. मात्र, मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे बुधवारी आक्षी येथे दौऱ्यावर आहेत. एका कार्यक्रमानिमित्त ते आक्षीमध्ये दुपारी ३.०० वाजता येणार आहेत. परंतु, आक्षी जवळील रस्त्याच्या दुतर्फा असलेला कचरा त्यांना दिसू नये, म्हणून कचऱ्यावर कापडी पडदा लावण्याचे काम करण्यात आले आहे. मंत्र्यांना हा कचरा दिसू नये म्हणून करण्यात आलेल्या प्रकाराबाबत स्थानिकांकडून चर्चेला उधाण आले आहे.

## दिघी-पुणे पर्यायी रस्ता रखडला

होऊ शकतो. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांनी मावळ येथे झालेल्या एका कार्यक्रमात हा रस्ता पुर्ण करण्याचे आश्वासन ग्रामस्थ व नागरिकांना दिले होते.

या मार्गातील बहुतांश काम पूर्ण झाले असले, तरी घोळ या गावापर्यंतचा सुमारे ७ किमीचा टप्पा अद्याप अपूर्णच आहे. त्यातील ४ किमी भाग रायगड जिल्ह्यात, तर ३ किमी भाग पुणे जिल्ह्यात येतो. मात्र, दोन्ही जिल्ह्यांतील बांधकाम विभागांमध्ये तसेच दोन्ही जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्यात अपेक्षित समन्वय नसल्यामुळे हा छोटासा पण अत्यंत महत्त्वाचा दुवा अजूनही पूर्णत्वास गेलेला नाही. परिणामी, हजारो कोटींच्या विकासाला गती देणारा प्रकल्प कागदावरच अडकून पडला आहे.

सध्या ताम्हिणी घाट हा कोकणपुणे दळणवळणाचा मुख्य मार्ग आहे. मात्र, अरुंद रस्ता, तीव्र वळणे, धोकादायक उतार आणि वारंवार होणारे अपघात यामुळे ताम्हिणी घाट हा मार्ग प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरतो. हा नवीन पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यास ताम्हिणी घाटावरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होईल अशी प्रवासी पर्यटकांची मागणी आहे.

**दिघी-पुणे पर्यायी मार्ग पूर्ण झाल्यास सुमारे २५ ते ३० किमी अंतर कमी होणार असून प्रवास वेळेत आणि खर्चात लक्षणीय बचत होईल. मुळशी-ताम्हिणी पूल व बोगदा हा पहिला पर्याय तर माणगाव, कुंभे, घोळ व पानशेत मार्ग हा दुसरा प्रभावी पर्याय मानला जात आहे, जो ताम्हिणी घाटावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो. ३८ हजार कोटींच्या गुंतवणुकीत उभारले जाणारे दिघी बंदराचा पुण्याशी थेट संपर्क झाल्यास पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते.**

**– डॉ. मोहन दोशी, सामाजिक कार्यकर्ते, माणगाव**

## पाणदिवे गावात १५ डेंग्यूचे रुग्ण

आजारांच्या रुग्णांचा समावेश असतो. परंतु, सध्या उन्हाळ्याच्या दिवसात उद्भवणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील नागरिकांनी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आप आपल्या घर परिसरात पाण्याची साठवणूक केली आहे. परंतु, उघड्यावर पाण्याची साठवणूक करण्यात आल्याने त्यात डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे पाणदिवे गावात १५ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. हे रुग्ण खासगी व सरकारी रुग्णालयात उपचार करुन घेत असल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, या आजारांचा अधिक प्रसार होऊ नये यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोलीच्यावतीने यासंदर्भात उपाय योजना तसेच जनजागृती करण्यात येत आहे. तरी, नागरिकांनी आप आपल्या घरात साठवून ठेवले पाणी झाकून ठेवावे. तसेच, आपल्या घर परिसरात डासांची उत्पत्ती वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. तीव्र डोकेदुखी, डोळ्यांमागे वेदना, स्नायू आणि सांधेदुखी, मळमळ, उलट्या, ग्रंथींना सूज, रॅशेस यांपैकी कोणतीही लक्षणं असतील तर नागरिकांनी घाबरून न जाता डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करुन घ्यावे, असे आवाहन तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. वंदनकुमार पाटील यांनी केले आहे.

## अनधिकृत आरएमसीचा कहर

आणि त्वचारोग वाढत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना याचा अधिक फटका बसत असल्याचे सांगितले जात आहे. काही स्थानिकांनी सिलिकोसिससारख्या गंभीर आजाराचा धोका व्यक्त करत तातडीने कारवाईची मागणी केली आहे. रात्रंदिवस चालणाऱ्या मिक्सर ट्रक आणि यंत्रांमुळे ध्वनी प्रदूषण वाढले असून, नागरिकांची झोपमोड होत आहे. याशिवाय कांदळवनावर भराव टाकून नष्ट करण्यात येत असल्याने पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे.

**कारवाई कधी होणार?**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एमएमआरमध्ये अनेक प्लांट्स बंद केले असून, नियमबाह्य प्लांट्सवर दंड आकारले आहेत. रेवदंडा प्लांट अनधिकृत चालवून शासनाच्या डोळ्यात धूळफेक केली जात असल्याने तातडीने चौकशी, बंदी आणि भरपाईची मागणी केली जात आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या उद्योगावर शासन कधी कारवाई करणार?

**तहसीलदारांना विचारा...मंडळ अधिकाऱ्यांची आरेरावी**

चौल रेवदंडा बायपास वरील आरएमसी प्लांटला प्रदुषण विभाग व रायगड जिल्हाधिकारी यांची लेखी परवानगी आहे का? असे चौल रेवदंडा मंडळ अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितलं कि, अलिबाग तहसीलदार यांना विचारा मला काही विचारू नका. मला काही माहिती नाही, असे सांगून त्यांनी बोलणे टाळले.

## चाणजे घोटाळा दडपण्याचा प्रयत्न

अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात असूनही चौकशी अधिकाऱ्यांनी कॅशबुक, व्हाऊचर व नोंदींची तपासणी न करता अपहार नाही, असा अहवाल सादर केल्याचा आरोप आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाची चौकशी खोपोलीचे सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे यांच्याकडे गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून प्रलंबित आहे. चौकशीबाबत वारंवार विचारणा केली असता निवडणूक हे कारण पुढे करून वेळकाढूपणा करण्यात आला. मात्र, निवडणुका संपून २ महिने उलटूनही अहवाल तयार नसल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. त्यामुळे चौकशी लांबवण्यामागे नेमके कोणाचे संरक्षण आहे? मोठ्या आर्थिक व्यवहारामुळेच फाईल थंड बस्त्यात तर नाही ना, असे सवाल आता उघडपणे विचारले जात आहेत.

तक्रारदारांच्या मते, विस्तार अधिकारी विनोद मिंडे यांनी चौकशी न करता खोटे अहवाल सादर करून वरिष्ठ कार्यालयाची दिशाभूल केली. तसेच, काही प्रकरणांमध्ये दप्तर उपलब्ध नसल्याचे कारण देत तक्रारी परस्पर निकाली काढण्यात आल्या. त्यामध्ये आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, चौकशी अधिकारी प्रदीप कांबळे यांच्या कामकाजाचीही स्वतंत्र चौकशी करून, विस्तार अधिकारी विनोद मिंडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी ठाम भूमिका तक्रारदारांनी घेतली आहे.

# आसूड गावातील रस्त्याची दुरवस्था



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आसूड गावाच्या बाजूने जाणारा महत्त्वाचा रस्ता अनेक वर्षांपासून खड्डेमय व धूळमय अवस्थेत पडून असून त्याकडू प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. मुंबई-पुणे महामार्गाकडे जाण्यासाठी हा पर्यायी मार्ग म्हणून वापरला जात असला तरी त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. रस्त्यावर खड्डे, उडणारी धूळ आणि असमतोल पृष्ठभाग यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे हा रस्ता अक्षरशः बेवारस अवस्थेत सोडण्यात आल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. दरम्यान, या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून डांबरीकरण करावे, तसेच अवजड वाहनांवर नियंत्रण आणावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा अपघातांची शक्यता वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# नवघर ग्रामपंचायतीला नवीन घंटागाडी

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवघर ग्रामपंचायतीतर्फे ओएनजीसी कंपनीकडे दोन महिन्यांपूर्वी घनकचरा उचलण्यासाठी घंटागाडीची मागणी केली होती. त्यानंतर ओएनजीसीची एनजीओ संस्था आणि अधिकारी यांच्या सोबत अविनाश म्हात्रे यांनी सतत पाठपुरवठा केला. त्यानंतर नवघर ग्रामपंचायतीला नवीन घंटागाडीची व्यवस्था करून दिली. या घंटागाडीचे उद्घाटन सोमवारी (दि.६) ओएनजीसी कंपनीत प्लांट मॅनेजर एस.एन. अहमद सर आणि सपोर्ट मॅनेजर एस.के. मोहन यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून केले. यावेळी ओएनजीसीचे अधिकारी अभिषेक पाटील, इतर अधिकारी, तसेच सरपंच सविता मढवी, उपसरपंच प्रियदर्शनी म्हात्रे, नितीन मढवी, अविनाश म्हात्रे, आतिश भोईर आदी उपस्थित होते.

## निवडक



### सुनिल अंजर्लेकर यांना समाजभूषण पुरस्कार

**म्हसळा :** कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगडचा ४था वर्धापन दिन माणगाव तालुका कुणबी समाज भवन येथे संपन्न झाला. कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष रमाकांत क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थापक अध्यक्ष सतिश दरेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास महेश सायकर, संदिप पाटील, गजानन चौलकर, राजेंद्र मांगरूळकर,संतोष चौलकर, मीनाताई चौलकर, जितेंद्र पाभरेकर, सतिश येलमकर, रसिका खेडेकर, शरद वाडेकर, प्रकाश साळवी (कोकण विभागीय अध्यक्ष ), महेश कोलाटकर, अनंत महाडकर, शरद कुंभार, रमेश कुंभार, दिलीप साळवी, नंदकुमार चिरनेरकर, अनिल नागोठणेकर, मधुकर कुंभार, अरुण बामनोलकर, प्रवीण कुंभार, नंदकुमार पालवणकर, रामदास साळवी, कुंदन विन्हेरकर, अरुण म्हशेळकर, प्रतिभा वाडेकर, योगेश कुंभार, राजेश म्हाप्रळकर आदी रायगड जिल्हा कुंभार समाज सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, ज्ञाती बांधव, हितचिंतक आणि मान्यवर उपस्थित होते. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील समाज बांधवाना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




### तळा बसस्थानकाला कमिटीची भेट

**तळा :** स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाची अमंलबजावणी प्रत्येक विभागात केली जात असून मध्यवर्ती कार्यालय पालघर विभागाकडून तळा बस स्थानकात विभाग नियंत्रक कैलास पाटील विभागीय कर्मचारी वर्गअधिकारी विजय पवार समवेत रोहा आगार व्यवस्थापक प्रकाश शेलार यांनी येऊन पाहणी केली. यावेळी प्रवासी मित्र प्रतिनिधी जनार्दन वडके वाहतूक नियंत्रक वारगुडे उपस्थित होते यावेळी स्पर्धात्मक अहवाल भरून घेण्यात आला. कोरोना संकट व त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांचा पाच महिने चाललेला संप यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत घट झाली आणि राज्य परिवहन महामंडळाला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. मात्र दोन वर्षभरापासून एसटी महामंडळाने पुन्हा एकदा एसटीचा गाडा रुळावर आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत त्याचाच एक भाग म्हणून १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबविण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. हे अभियान स्पर्धात्मक स्वरूपात असून उत्कृष्ट बसस्थानकांना गौरविण्यात येणार आहे.



### हरवलेले मोबाईल तक्रारदारांना केले परत

**महाड:** हरवलेले मोबाईल शोधण्यात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याला मोठे यश आले असून सुमारे १ लाख ८० हजार रुपये किमतीचे ६ मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि मफ पोर्टलच्या प्रभावी वापरामुळे ही कारवाई यशस्वी झाली आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून विविध काळात मोबाईल हरवल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. या प्रकरणांचा गांभीर्याने तपास करत, सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार डी. बी. बल्लाळ यांनी तांत्रिक तपास सुरू केला. केंद्र सरकारच्या पोर्टलची मदत घेत या मोबाईलचा माग काढण्यात आला आणि अखेर ६ मोबाईल हस्तगत करण्यात आले. विलास शांताराम सुंबे विवो ५०, संकेत सुदीप सपकाळ ओप्पो ९,धनश्री अशोक शिंदे रिअलमी १, राजेश इराप्पा कांबळे रिअलमी ३, निलेश शांताराम कदम टेक्नो स्पार्क १० प्रो, राजेश नथू वाले ओप्पो ५९ यांना मोबाईल परत करण्यात आले. पोलिसांनी २०२६ या वर्षात आतापर्यंत एकूण १३ मोबाईल शोधून काढले आहेत.



### वाशिवलीत हिंदू राष्ट्र जागृती सभा

**रसायनी :** अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरावर ध्वजारोहण होणे ही १०० कोटी हिंदूंच्या श्रद्धेचा धर्मध्वज आहे. सनातन हिंदू धर्माचे वैशिष्ट्ये आहे की संपूर्ण विश्व सुखी होवोची भावना प्रत्येक हिंदूंची आहे. सनातन हिंदू धर्माचे आचरण केल्यामुळे ईश्वराचे चैतन्य आपण ग्रहण करू शकतो. हिंदू समाज बलशाली होण्यासाठी प्रत्येक हिंदू कडून धर्माचरण होणे गरजेचे आहे. हिंदूनी केवळ जन्म हिंदू न राहता कर्महिंदू व्हा, असे आवाहन हिंदू जनजागृती समितीचे सुनील कदम यांनी केले. रसायनी येथील वशिवली गावात संपन्न झालेल्या हिंदू राष्ट्रजागृती सभेत ते बोलत होते, सांस्कृतीक, आध्यात्मिक सुशोभीकरण मंडळ यांच्या वतीने डॉ. पानेरकर महाराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज वशिवली मैदानात ही सभा आयोजित केली होती. मंडळाच्या वतीने पंचक्रोशीतील ग्रामस्थामध्ये सनातन हिंदू धर्माचे महत्व बिंबवण्यासाठी हिंदू राष्ट्र जागृती सभेचे आयोजन करण्यात आले होते. हि सभा यशस्वी होण्यासाठी सांस्कृतीक आध्यात्मिक सुशोभीकरण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला तसेच धर्मकार्यासाठी यापुढेही असेच संगठीत पणे प्रयत्न करू असा निर्धार यावेळी व्यक्त केला.

# आंबेघर ग्रामस्थांचे पाण्यासाठी उपोषण

## राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसलेंकडे तक्रार

| नागोठणे | प्रतिनिधी |

उष्णतेचा दाह अधिकाधिक तीव्र होत असतानाच नागोठण्याजवळील पिगोंडे ग्रामपंचायतीमधील आंबेघर येथील महिला व ग्रामस्थ गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या पाणीटंचाईने त्रस्त झाले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा आंबेघर ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.



दरम्यान पिगोंडे ग्रामपंचायत कार्यालयासमोर जमलेल्या ग्रामस्थांतर्फे माजी उपसरपंच रंजना माळी यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे भ्रमणध्वनीवर संपर्क साधून रिलायन्स कंपनीकडून वार्षिक दीड कोटी रुपये कर मिळणाऱ्या या ग्रामपंचायतीकडे कोट्यवधी रुपये जमा असतांनाही निर्माण झालेल्या पाणी टंचाई संदर्भात तसेच ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासक व गटविकास अधिकारी यांच्याविषयी तक्रार करून याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

नागोठण्याजवळील पिगोंडे ग्रामपंचायतीमधील सरपंच व सदस्यांची मुदत दोन वर्षांपूर्वीच पूर्ण झाल्याने ग्रामपंचायतीत सध्या प्रशासकीय राजवट सुरू असून शांतेश जुजगार हे येथे प्रशासक म्हणून कार्यरत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार आंबेघर गावातील पाणी टंचाईवर उपाययोजना म्हणून गावातील पंप हाऊसमध्ये १५ अश्वशक्तीचा पाण्याचा पंप पासून पंप हाऊस पासून साठवण टाकीपर्यंत ४ इंच व्यासाची नवीन जलवाहिनी टाकण्याचा ठराव १५ ऑगस्ट, २०२५ च्या ग्रामसभेत मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थांच्या व महिलांच्या उपस्थितीत घेण्यात आला होता. मात्र सात महिने उलटूनही या कामाचे साधे अंदाजपत्रकही तयार करण्यात आले नाही. त्यामुळे पाणी टंचाईने त्रस्त झालेल्या महिला व ग्रामस्थांनी पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी वारंवार निवेदन देऊनही ग्रामपंचायत प्रशासनाने कोणतीही उपायोजना न केल्याने अखेर १२ मार्च, २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकण्याचा निर्णय घेतला होता.

मात्र त्यावेळी रोहा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील यांनी ग्रामस्थांजवळ चर्चा केली होती. त्यानंतर आपण लवकरच यावर उपाययोजना करू असे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे लावण्याचा आपल्या भूमिकेस तात्पुरती स्थगिती दिली होती. त्यानंतर आजतागायत पाण्याविषयी कोणतीही उपाययोजना न झाल्याने शेवटी पुन्हा एकदा आंबेघर ग्रामस्थ व महिलांचा भडका उडाला आहे.

त्यानुसार आंबेघर गावातील महिला व ग्रामस्थांनी मंगळवारी (दि.७) सकाळी ११ वाजता पिगोंडे ग्रामपंचायत कार्यालय गाठले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विजय अहिरे हे प्रकृती अस्वस्थेमुळे रजेवर असल्याचे आणि प्रशासक शांतेश जुजगार हे कार्यालयात न येता त्यांनी आपला मोबाईल बंद ठेवल्याचे दिसून आले. त्यामुळे उपस्थित महिला व ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात आपला तीव्र संताप व्यक्त केला. यावेळी आंबेघर मधील गंगाराम मिणमिणे, बळीराम बडे, माजी उपसरपंच काळुराम माळी, माजी उपसरपंच रंजना माळी, विठोबा माळी, देवराम घासे, नामदेव घासे वृषाली माळी, पूनम डाकी, सुषमा घासे, प्रमिला घासे, पिंकी डाकी, शालिनी बडे आदींसह आंबेघर मधील अनेक ग्रामस्थ व महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**महिलांसमोर प्रश्न**

मुख्य जलवाहिनीमधून घेण्यात आलेले अनेक अनधिकृत जोडण्या, स्वतःच्या व्यवसायासाठी चोरले जाणारे पाणी यामुळेच आंबेघर गावात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. सद्यस्थितीत अत्यल्प प्रमाणात पाणी येत असल्याने जेमतेम पिण्याचे पाणी उपलब्ध होत असून स्नान व इतर विधी तसेच कपडे धुण्यासाठी कोणते पाणे वापरायचे हा गहन प्रश्न ग्रामस्थ, विशेषकरून महिलांसमोर उभा राहिला आहे.

# पीएनपीची किल्ले रायगड शैक्षणिक सहल

| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभागामध्ये शिकत असलेल्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल किल्ले रायगड आणि महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे येथे काढण्यात आली होती.



मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार कला शाखेतील तृतीय वर्गाच्या इतिहास विभागातील विद्यार्थ्यांना मराठ्यांचा इतिहास, आधुनिक महाराष्ट्राचा व भारताचा इतिहास हे पेपर अभ्यासक्रमात आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी व स्मृतीस्थळ रायगड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्यावर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला सत्याग्रह या ऐतिहासिक घटनांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

ह्या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी रायगड व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चवदार तळ्याचा सत्याग्रह या घटनांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी मदत झाली. ही शैक्षणिक सहल यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

इतिहास विभागाचे प्रा. मिलिंद घाडगे व प्रा. साईनाथ पाटील तसेच इतिहास विभागाचे सर्व विद्यार्थी यांनी या शैक्षणिक सहलीचे नियोजन केले होते.

## प्रलंबित मागण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन

| आगरदांडा | प्रतिनिधी |

पोलिस हवालदार पदावर पदोन्नती देताना एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती होण्याकरिता निवृत्त पोलीस अंमलदारांनी केलेल्या अर्जावर ८ महिने होऊन ही कोणतीही कार्यवाही होत नसल्याचा निषेधार्थ तसेच विविध मागण्या करिता धरणे आंदोलन सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी संस्था रायगड अलिबागच्या वतीने १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रायगड अलिबाग पोलीस अधीक्षक कार्यालया समोर एक दिवसीय धरणे आंदोलनात १५० सदस्य सहभागी होणार आहेत.

या संदर्भातील निवेदन रायगड अलिबाग पोलीस अधीक्षक तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी रायगड, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ३. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी, अप्पर पोलीस अधीक्षक, रायगड यांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी संस्था रायगड अलिबाग अध्यक्ष राजेंद्र कासार, कार्याध्यक्ष चंद्रकांत पाटील, सचिव दिलीप पाटील, सह सचिव विश्वनाथ पाटील, कोषाध्यक्ष दत्तात्रेय झेमसे, सह कोषाध्यक्ष कमळाकर भऊड, सदस्य सुनिल गोंधळी सदस्य विलासराव जाधव आदिंसह सेवानिवृत्त पोलीस उपस्थित होते.

## ढोकळेवाडी फाटा चंदरगाव रस्ता वीस वर्षांपासून दुर्लक्षित

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

ढोकळेवाडी फाटा ते चंदरगाव हा अंदाजे सहा किलोमीटरचा रस्ता गेली वीस-बावीस वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाने या रस्त्याकडे दुर्लक्ष केले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी देखील या विषयावर ठोस आवाज उठवताना दिसत नाहीत.



या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जंगल परिसरातून जाणारा हा रस्ता असल्याने वाहनचालकांना धोके निर्माण होतात. रस्त्यावर जागोजागी मोठे दगड बाहेर आले असून त्यामुळे पायी चालणेही कठीण झाले आहे. वाहनचालकांना या मार्गावरून प्रवास करताना वाहनांचे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

# श्री जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा संपन्न

## तब्बल ८४ तासांनी पालखी मंदिरात परतली

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराजांचा शुक्रवारी (दि.३)सकाळी साडेनऊ वाजता मोठ्या उत्साहात सुरु झालेला चैत्र पालखी सोहळा चौथ्या दिवशी सोमवारी (दि. ६) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पालखी मंदिरात पोहोचल्यानंतर तब्बल ८४ तासांनंतर निर्विघ्नपणे पूर्ण झाला.



एप्रिल, २०२२ च्या पालखी सोहळ्याला ७५ तास लागल्यानंतर मागील दोन तीन वर्षे पालखी सोहळ्याची वेळ ४८ ते ५५ तास अशी कमी करण्यात उत्सव समितीला यश आले होते. गेल्या वर्षी ६४ तासांत पालखी मंदिरात परतली होती. त्यानंतर यावर्षी पालखी सोहळ्याची आतापर्यंतची सर्वात जास्त अशी ८४ तासांची वेळ नोंदली गेली आहे.

नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराजांची पालखी ग्रामस्थांना दर्शनासाठी नागोठण्यातील सर्व भागांत नेण्यात आली. या पालखी सोहळ्या निमित्ताने नागोठण्यातील परंतु नोकरी, व्यवसाया निमित्ताने गावाबाहेर असलेले चाकरमानी, ग्रामस्थ आणि माहेरवाशिणी गावात आवर्जून परतल्या होत्या.

जोगेश्वरी मातेच्या या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने ग्रामस्थांना घरोघरी मातेचे दर्शन होणार असल्याने मातेच्या स्वागतासाठी सर्वत्र आकर्षक सजावाटी, रांगोळ्या काढून तसेच विद्युत रोषणाई करून स्वागतकमानी उभारण्यात आल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण गावात एक आनंदाचे, उत्साहाचे व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

हा पालखी सोहळा निर्विघ्नपणे यशस्वी होण्यासाठी जोगेश्वरी माता विश्वस्त समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ यांनी मेहनत घेतली.

## गंभीर एंडोमेट्रिओसिसवर महिलेची मात

| पनवेल | प्रतिनिधी |

मदरहुड हॉस्पिटलमध्ये गंभीर एंडोमेट्रिओसिस, अंतर्गत अवयवांची गुंतागुंत आणि कमी स्त्रीबीजसंख्या असूनही ३१ वर्षीय महिलेने निरोगी बाळाला जन्म दिला. काही वर्षांपासून ती मासिक पाळीदरम्यान तीव्र वेदना सहन करत होती. सुरुवातीला हा सामान्य त्रास असल्याचे गृहीत धरले, गर्भधारणेचा प्रयत्न करताना समस्या गंभीर असल्याचे स्पष्ट झाले.तपासणीत एंडोमेट्रिओटिक सिस्ट्स, अवयवांमध्ये चिकटपणा आणि लो ओव्हेरियन रिझर्व्ह आढळले. यामुळे नैसर्गिक गर्भधारणा कठीण होती.त्यासाठी हार्मोनल उपचार देण्यात आले.

# चार डॉक्टरांवर आरोपपत्र दाखल

| नेरळ | प्रतिनिधी |

माणिवली गावातील रोहित गवळी या दहावीमध्ये शिकणाऱ्या तरुणाला रायगड हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना मृत्यू झाला होता. या प्रकरणी चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याचा ठपका रोहित गवळी यांच्या नातेवाईक यांनी केला होता. दरम्यान या प्रकरणी न्यायालयाने आरोपी म्हणून चार डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत तर संस्था चालक यांना सह आरोपी करावे असे आदेशात नमूद केले आहे.

माणिवलीगावातीलरोहितगवळी हा रायगड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाला. रुग्णालयात त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि शस्त्रक्रियेदरम्यान रोहितचा मृत्यू झाला. या संदर्भात नेरळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

■ **रोहित गवळी प्रकरणी कोर्टाचा मोठा निर्णय**

सदर गुन्ह्याचा तपास नेरळ पोलिस ठाण्याचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी सखोलपणे करून संबंधित आरोपींविरुद्ध आवश्यक ते पुरावे संकलित केले. तसेच मेडिकल कौन्सिलने चार डॉक्टर आणि व्यवस्थापनाला दोषी ठरवले. तपासाअंती उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे डॉक्टरांविरुद्ध प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कर्जत यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याची नोंद समरी केस क्रमांक ३८९/२०२५ अशी करण्यात आलेली आहे.



तसेच,तपासादरम्यान संबंधित घटनेत हॉस्पिटल व्यवस्थापनाची देखील जबाबदारी आढळून आली.त्यामुळे संस्थेचे चेअरमन डॉ. नंदकुमार तासगावकर, सेक्रेटरी यादवराव कांबळे, जॉईंट सेक्रेटरी वंदना नंदकुमार तासगावकर, विश्वस्त डॉ. शशिकांत रामचंद्र गंगावणे आणि चंद्रशेखर सिताराम सुळगावकर यांना देखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे.

## माथेरानमध्ये दिव्यांग निधी वाटप

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या वतीने दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दिव्यांग निधी वाटप व आर्थिक लाभ वितरण कार्यक्रम कम्युनिटी सेंटर हॉल या ठिकाणी आयोजित करण्यात आला. पारदर्शकतेसाठी ही लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे.

वर्षाला सोळा हजार रुपये या दिव्यांग बांधवांना नगर परिषदेच्या राखीव निधीतील उत्पन्नातून पाच टक्के रक्कम ही दिव्यांग बांधवांना मदत म्हणून दिली जाते. यावेळी मुख्याधिकारी राहुल इंगळे, सभापती रिजवाना शेख, चंद्रकांत जाधव, नगरसेवक सुनील शिंदे, प्रवीण सकपाळ, मनोज खेडकर, सोहेल महापुळे, केतन रामाने, नगरसेविका लता ढेबे, सुरेखा साळुंखे, ऐश्वर्या तोरणे, अर्चना भिल्लारे, कमल गायकवाड, प्रतिभा घावरे आदी उपस्थित होते.

लाभार्थ्यांना या निधीतून स्वयंरोजगार प्राप्त व्हावा त्याचप्रमाणे त्यांनी आरोग्यासाठी विमा काढल्यास त्यांना भविष्यात जो काही आरोग्यासाठी होणारा आवश्यक खर्च आहे त्यासाठी उपयोगी पडू शकतो. सध्या माथेरानमध्ये चाळीस दिव्यांग व्यक्ती असून त्यांना वेळोवेळी समस्या भासतात त्यावेळी मानव सेवा दिव्यांग कल्याणकारी संस्था अध्यक्ष चंद्रकांत जाधव हे सहकार्य करीत आहेत.

**आझाद मैदानावर महिनाभर उपोषण | लेखी आश्वासन मिळविण्याचा निर्धार**

# ‘समग्र’ कर्मचारी न्यायाच्या प्रतीक्षेत

| कोर्लई | प्रतिनिधी |

शासन सेवेत कायम करा आणि आपल्या विविध मागण्यांसाठी समग्र शिक्षा अभियान कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण व अन्न त्याग सुरू केला आहे. उपोषण सुरू होउन महिना संपला आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत घेण्यात यावे या मागणीसाठी उपोषण करताना कोणत्याही प्रकारचा लेखी जीआर मिळालेला नाही म्हणून जोपर्यंत लेखी जीआर निघत नाही तोपर्यंत कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.




एकूण १३ कॅडरचे असणारे संघर्ष समिती मधील कर्मचारी हे शासनाच्या सेवांपासून आजपर्यंत वंचित आहेत त्यांना शासन सेवेत समावेशन करून मुख्यमंत्र्यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करावा ही वारंवार विनंती करण्यात येत आहे सर्व शिक्षा अभियानामधील ज्याप्रमाणे ३००० कर्मचारी नियमित केले त्याचप्रमाणे उर्वरित ३७७९ कर्मचारी यांना देखील शासन सेवेत समायोजन करावे. तसे आदेश प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावेत आणि समकक्ष वेतनश्रेणीवर समावेश करून सर्व शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा.यासाठी हे उपोषण सुरू आहे.

उपोषणाची दखल घेत आहेत त्याचप्रमाणे शिक्षक संघटना, केंद्रप्रमुख संघटना, मुख्याध्यापक संघटना, पदवीधर संघटना प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांना देखील सर्वशिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी शिफारशी केलेले आहेत. त्यांची या कार्यालयाला व विद्यार्थ्यांना शिक्षकांना अत्यंत आवश्यकता असल्याचेदेखील लेखी दिलेले आहे. तरीयासर्वांचासहानुभूतीपूर्वक विचार करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समग्र शिक्षा अभियान कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करावे.अशी मागणी असून जो पर्यंत लेखी जीआर काढला जात नाही, तोपर्यंत समग्र शिक्षा अभियान कर्मचाऱ्यांनी उपोषण सुरु ठेवण्याचा निर्धार केला व्यक्त केला आहे.

# चौकशी आणि राजकारण

भोंदूबाबा खरात याच्याविरुध्द सध्या आठ गुन्हे दाखल आहेत. त्यात काहींमध्ये त्याला न्यायालयीन कोठडी तर काहींमध्ये पोलिस कोठडी मिळाली आहे. अशा गंभीर गुन्ह्यात अडकलेले बाहेर असेपर्यंत मजेत असतात. पण तुरुंगात जाताक्षणीच त्यांची तब्येत बिघडते व त्यांना नाना दुखणी होऊ लागतात. खरातचे तसे झाले आहे. त्याच्या प्रकरणाचा तपास चालू आहे. पण खरातचे राजकारण्यांशी असलेले संबंध लक्षात घेता हा तपास कोणते वळण घेईल हे सांगता येत नाही. खरातच्या मालमत्तांच्या संबंधींच्या गुन्ह्यांबाबत त्याच्याविरुध्द इडीमार्फत चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी परवा केली. त्यात काही राजकारणाचा संदर्भ आहे काय हे पाहायला हवे. अवघ्या चार दिवसांपूर्वी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी खरातच्या जमीन प्रकरणांची महसूल विभागामार्फत चौकशी चालू असून दुसरी वेगळी चौकशी करण्याची गरज नाही असे वक्तव्य नागपुरात केले होते. त्याला त्यांचे नेते असलेल्या फडणवीसांनीच आता छेद दिला आहे. हे का घडले याचे उत्तर काही महिन्यांनी कळेल. इडी ही अत्यंत बदनाम तपास संस्था आहे. भाजप सरकारच्या इशाऱ्यावर विरोधकांना छळण्यासाठी तिचा सर्रास वापर झाल्याची उदाहरणे आहेत. इडीला तपासासंबंधी अमर्याद अधिकार आहेत. पण इडीने दाखल केलेली बहुसंख्य प्रकरणात नंतर काहीही निष्पन्न झालेले नाही. काँग्रेस व सोनिया गांधी यांना छळण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल हेराल्ड वर्तमानपत्राचे प्रकरण चालू करण्यात आले. पण हा खटला न्यायालयाने उडवून लावला. अरविंद केजरीवाल यांच्या सरकारची दारु घोटाळ्याच्या प्रकरणातही ते निर्दोष असल्याचे दिसले. अनेकदा आरोपी मधल्या काळात भाजपच्या गोटामध्ये दाखल झाले की इडीचा तपास रेंगाळतो असेही दिसले आहे. आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सर्मा ते महाराष्ट्राचे छगन भुजबळ यांची प्रकरणे सर्वांसमोर आहेत. त्यामुळे अशा इडीला खरातचे प्रकरण देण्यामागे काही राजकीय हेतू तर नाहीत ना असा प्रश्न सामान्यांच्या मनात उभा राहिला आहे. काही नेत्यांना वाचवण्यासाठी आणि काहींना दबावात ठेवण्यासाठी याचा उपयोग होईल असे सर्रास बोलले जात आहे. फडणवीस सरकारची लोकांमधील प्रतिमा काय आहे हे दर्शवणारी ही चर्चा आहे.

## इडी म्हणजे संशय

खरातने बुवाबाजी केली, स्त्रियांचे भयंकर शोषण केले व लोकांना लुटले हे उघड आहे. त्याच्या गुन्ह्यांचा तपास एसआयटी करेलच. पण या बाबाला इतके अभय मिळण्याचे व अनेक वर्षे अनिर्बंधपणे त्याचे धंदे चालू राहण्याचे खरे कारण म्हणजे राजकारणी व सनदी अधिकारी यांचे त्याच्याशी असलेले संबंध. या मंडळींचे भविष्य तो सांगत असेल. त्यांच्यासाठी मंत्रतंत्र करीत असेल. पण तो केवळ एक भाग झाला. अनेक नेते व अधिकारी यांच्या बेनामी जमिनी, फ्लॅट किंवा पैसे खरातच्या नावे होते की काय असा संशय आता निर्माण झाला आहे. शिर्डी तसेच सिन्नरमधील अनेक पतसंस्थांमध्ये भोंदूबाबाची खाती होती. अनेक ठिकाणी त्याच्या एकेका दिवसात शेकडो खाती उघडली गेली आहेत. त्याच्या भक्तांच्या नावानेही असंख्य खाती असून त्यात वारस म्हणून या बाबाचे नाव आहे. या खात्यांसाठी आधारकार्ड वा फोन नंबर बाबाचा दिला गेला आहे. त्यामुळे भक्तांच्या नावाने बाबाचे पैसे या खात्यांमध्ये विखुरलेले असावेत असा संशय आहे. प्राप्तिकर खात्याच्या कचाट्यात वाचण्यासाठी हे धंदे केलेले दिसतात. याखेरीज बाबाने नाशिक व नगर जिल्ह्यामध्ये प्रचंड जमिनी खरेदी केलेल्या आहेत. अनेकांना धाक दाखवून त्या लुबाडलेल्या आहेत. हे सर्व व्यवहार खरातचेच आहेत की त्याचे नाव पुढे करून राजकारणी व अधिकारी हे करीत होते हे पाहायला हवे. ठाण्याच्या एका उपजिल्हाधिकाऱ्यांचे नाव यात पुढे आले आहेच. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खरातने हजारो कोटी रुपये हवाला मार्ग परदेशात पाठवल्याचाही संशय आहे. याला राजकीय पाठबळ असल्याखेरीज हे घडणे शक्य नाही. भक्कम नेता खरातच्या मागे असल्यामुळेच सरकारी अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले असावे. दुर्दैवाने यापूर्वी अशाच प्रकरणांमध्ये हे पडद्याआडचे कलाकार उर्फ राजकीय नेते व अधिकारी पडद्यामागेच राहतात. चौकशी कधीच त्यांच्यापर्यंत पोचत नाही. आता इडीकडे हा तपास सोपवून हीच गुंडाळणी करण्याचा डाव आहे की काय असा संशय आला तर तो गैर म्हणता येणार नाही.

## आणि दमानियाबाई

प्रकरण उघडकीस आले तेव्हा खरातचे फोटो सर्व नेत्यांसोबत असल्याचे प्रसिध्द झाले. अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांचेही फोटो आहेत हे दिसले. पण चौकशी पुढे गेली तसतसे हा तपशील मागे ढकलला गेला. रुपाली चाकणकर आणि एकनाथ शिंदे यांचे अधिक घनिष्ठ संबंध असावेत अशी माहिती मात्र पद्धतशीरपणे बातम्यांमधून येऊ लागली. शिंदे व चाकणकर यांच्या संबंधांची चौकशी व्हायलाच हवी. पण देशाच्या व राज्याच्या गृहमंत्र्यासोबत खरातचे फोटो असतील तर त्यांच्यापर्यंत तो कसा पोचला, त्याच्या भेटीचे त्यावेळचे कारण काय फडणवीसांचे काय व किती वेळ बोलणे झाले अशी माहिती त्यांनी स्वतःहून उघड करायला हवी. मात्र तसे झालेले नाही. उलट बाकीच्या नेत्यांबाबतची माहिती मात्र टप्प्याटप्प्याने उघड होत आहे. एकनाथ शिंदे आणि रुपाली चाकणकर या खरातशी किती वेळा आणि किती मिनिटे फोनवर बोलले याची आकडेवारी परवा उघड झाली. बरे ती पोलिसांनी केली असेही नाही. ती केली अंजली दमानिय नावाच्या बाईंनी. या बाई स्वतःला समाज कार्यकर्त्या म्हणवतात.पण यांना सोईस्करपणे अधूनमधून जाग येत असते. मध्यंतरी बीडच्या संतोष देशमुख प्रकरणात या रोज काही ना काही बोलत होत्या. अखेर धनंजय मुंडे मंत्रिपदावरून गेल्यावर त्या गप्प झाल्या. मुंबईत धारावी प्रकल्पाच्या बदल्यात अदानीला शेकडो एकर जमीन दिली जाते किंवा शक्तीपीठ मार्गामध्ये सरकारच्या सोईसाठी वाट्टेल ते बदल केले जातात तेव्हा त्यातला भ्रष्टाचार या बाईंना दिसत नाही. त्यात बहुदा थेट फडणवीसांचा संबंध असल्याने तसे होत असावे. पण पूर्वी भुजबळ, खडसे आणि आता एकनाथ शिंदे अशासारख्यांना लक्ष्य करणारी माहिती घेऊन मात्र त्या बरोबर पुढे येतात. आतादेखील शिंदे सेनेला जरबेत ठेवण्यासाठी भाजपने खरात प्रकरणातील त्यांचा संबंध पध्दतशीरपणे पुढे आणल्याची चर्चा चालू आहे. दमानिया यांच्यामुळे तिला बळ मिळाले आहे. ज्या प्रकरणाचा पोलिसांमार्फत चालू आहे त्यातली कॉल रेकॉर्डसारखी माहिती आकडेवारीनिशी दमानिया बाईंच्या हाती लागणे हेच संशयास्पद आहे. आपण एआयचा वापर केल्याचे त्या सांगतात. ते खरे आहे का हे जाणकारांनी ठरवावे. पण या बाई काही ठराविक प्रकरणात ठराविक मंडळींच्या विरोधातच बोलतात हे वास्तव त्यामुळे दडून राहत नाही. खरातसारख्या प्रकरणांचा इडी किंवा दमानियांसारख्यांच्या मार्फत राजकीय उपयोग होत असेल तर ते चिंताजनक आहे.

विचार

# अमेरिकेचा वादग्रस्त अहवाल काय सांगतो?

***संविधानाने दिलेले धार्मिक स्वातंत्र्य कागदावरील तत्त्व नसून प्रत्यक्षातही प्रभावीपणे अंमलात येणे आवश्यक आहे. कोणत्याही धर्माच्या विरोधात होणाऱ्या हिंसेवर कठोर कारवाई होणे हीच लोकशाहीची कसोटी. या पार्श्वभूमीवर 'यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलीजीयस फ्रीडम'चा ताजा अहवाल एक इशारा ठरतो. त्यातील मुद्द्यांवर विचार करून सुधारणा करणे, पुराव्यांसह प्रत्युत्तर देणे हा संतुलित दृष्टिकोनच हिताचा आहे.***

**जनार्दन पाटील**

यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलीजीयस फ्रीडम'चा अहवाल अलिकडे चर्चेत आला. त्यात भारतातील धार्मिक स्वातंत्र्य आणि वातावरणावर महत्वपूर्ण भष्य करण्यात आले आहे. या अहवालानुसार २०२४ मध्ये भारतातील धार्मिक स्वातंत्र्याची परिस्थिती सतत खालावत गेली. अल्पसंख्याकांवरील हल्ले आणि भेदभाव वाढतच राहिले. लोकसभा निवडणुकांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपच्या अन्य नेत्यांनी मुस्लिम आणि इतर अल्पसंख्याकांविरोधात द्वेषपूर्ण वक्तव्ये आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवून राजकीय पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला. अशा वक्तव्यांमुळे धार्मिक अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांना चालना मिळाली आणि निवडणुकांनंतरही ते सुरूच राहिले. त्यात जमावाकडून हिंसा, लक्ष्य करून मनमानी पद्धतीने हत्या तसेच मालमत्ता आणि उपासनेच्या स्थळांचे पाडकाम यांचा समावेश होता. सरकारने नवीन कायदे करून फौजदारी संहिताही बदलली. त्यामुळे भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आली आणि अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्याची शक्यता वाढली. आसाममध्ये विदेशी न्यायाधिकरणांनी २८ मुस्लिमांना नागरिक नसल्याचे घोषित करून निर्वासन केंद्रात पाठवले. दिल्ली विकास प्राधिकरण (डीडीए) सारख्या विविध प्राधिकरणांनी उपासनेच्या स्थळांचे अधिग्रहण आणि पाडकाम सुलभ केले. त्यात पाडलेल्या मशिदींवर हिंदू मंदिरांची उभारणी करण्यात आली. राम मंदिर प्राणप्रतिष्ठेनंतर सहा राज्यांमध्ये धार्मिक अल्पसंख्याकांवरील हल्ले वाढले. भारतीय दंड संहितेतील कलम २९५ हे उपासनेच्या स्थळांचे नुकसान किंवा नाश करण्यास गुन्हा ठरवते. त्याचे उल्लंघन करत अधिकाऱ्यांनी 'बेकायदेशीर' ठरवलेल्या मशिदींसह मुस्लिमांच्या मालमत्तांवर बुलडोझर चालवले.

अहवालानुसार राज्यस्तरावर भेदभाव करणारे धर्मांतरविरोधी कायदे आणि गोहत्या प्रतिबंधक कायद्यांचा वापर करून अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्यात आले. उत्तर प्रदेशमध्ये पोलिसांनी चार पाद्रींसह २० ख्रिश्चनांना धर्मांतरविरोधी कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली अटक केली. उत्तर प्रदेश सरकारने हा कायदा अधिक कठोर करण्यासाठी विधेयक मांडले. त्यात शिक्षा जन्मठेपेपर्यंत वाढवणे, कोणालाही तक्रार दाखल करण्याची परवानगी देणे आणि धर्मांतर हा अजामीनपात्र गुन्हा ठरवणे यांचा समावेश होता. त्यानंतर उत्तर प्रदेश उच्च न्यायालयाने मुस्लिम धर्मगुरू कलीम सिद्दीकी आणि इतर ११ जणांना कथित जबरदस्ती धर्मांतर प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली. याशिवाय, उत्तराखंडने समान नागरी संहिता विधेयक मंजूर करून आंतरधर्मीय विवाहांवर अधिक देखरेख ठेवण्याची तरतूद केली. भारत सरकारने परदेशातही धार्मिक अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्याच्या कारवाया वाढवल्याचा आरोप आहे; विशेषतः शीख समुदाय आणि त्यांच्या समर्थकांविरुद्ध. धार्मिक स्वातंत्र्य उल्लंघनांची नोंद करणाऱ्या पत्रकार, संशोधक आणि सामाजिक संस्थांना वाणिज्यदूत सेवा नाकारण्यात आल्या, असे उल्लेख या अहवालात आहेत.

दर वर्षी अमेरिकेचा धार्मिक स्वातंत्र्यासंबंधीचा आंतरराष्ट्रीय आयोग एक अहवाल प्रकाशित करत असतो. या संस्थेचे गेल्या दहा वर्षामधील अहवाल आणि त्यावरील सरकारची प्रतिक्रिया पाहिली, तर दर वर्षी साम्य पहायला मिळते. भारताची प्रतिमा मलीन करण्याचे षडयंत्र तर ही संस्था रचत नाही ना, असा सवाल या संस्थेच्या काही शिफारशी उपस्थित करतात. या वर्षी तर अमेरिकेच्या या आयोगाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारताची गुप्तचर संस्था 'रॉ'वर बंदी घालण्याची शिफारस केली आहे. भारतातील धार्मिक स्वातंत्र्य खालावत असल्याचा दावा करत 'यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलीजस फ्रीडम' (यूएससीआयआरएफ)या अमेरिकन संस्थेने प्रसिद्ध केलेला अहवाल पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. या अहवालात भारतातील अल्पसंख्याकांवरील वाढते हल्ले, भेदभाव, कायद्यांचा कथित गैरवापर आणि राजकीय पातळीवरील वक्तव्ये यापुढे गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या अहवालात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या इतर नेत्यांवरही ठपका ठेवण्यात आला आहे. या आयोगाने भारतातील धार्मिक स्वातंत्र्याची स्थिती कथितरित्या खालावल्याचे सांगत 'विशेष चिंतेचा देश' (सीपीसी) म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे. गेल्या वर्षीही या संस्थेने 'रॉ'विषयी गंभीर टिप्पणी केली होती. या वर्षी त्यापुढे जात तिच्यावर बंदी घालण्याची शिफारस केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे धार्मिक स्वातंत्र्याची कशी गळचेपी होते, हे स्पष्ट करत तिच्यावरही बंदी घालण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या आयोगाच्या अहवालामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित मिळाले असले, तरी आयोगाच्या गेल्या काही वर्षांमधील अहवालातील मुद्दे आणि शिफारशी पाहिले, तर आयोगाने कुणाची तरी सुपारी घेतली असल्यासारखे वाटते. गेल्या काही वर्षांपासून भारताने या आयोगाचे अहवाल 'पक्षपाती आणि राजकीय हेतूंनी प्रेरित' मानत फेटाळले आहेत. 'यूएससीआयआरएफ'ने म्हटले आहे, की रॉ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संस्थांना धार्मिक स्वातंत्र्याच्या गंभीर उल्लंघनासाठी जबाबदार धरत निर्बंध घालावेत. यासाठी संबंधित व्यक्ती किंवा संस्थांची मालमत्ता जप्त करणे आणि/किंवा त्यांना अमेरिकेत प्रवेशबंदी घालणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, भारत सतत, प्रणालीबद्ध आणि गंभीर धार्मिक स्वातंत्र्य उल्लंघनात सहभागी आहे त्या स्वरुपाची कृत्ये सहन करतो, असे म्हणत त्याला 'सीपीसी' म्हणून घोषित करण्याची शिफारस करण्यात आली आहे. अहवालानुसार, २०२५ मध्ये भारतातील धार्मिक स्वातंत्र्याची परिस्थिती सतत बिघडत राहिली. सरकारने धार्मिक अल्पसंख्याक समुदाय आणि त्यांच्या उपासनेच्या स्थळांना लक्ष्य करणारे नवीन कायदे लागू केले, असे त्यात म्हटले आहे. अनेक राज्यांनी कठोर शिक्षेसाठी धर्मांतरविरोधी कायदे लागू करण्याचा किंवा अधिक कडक करण्याचा प्रयत्न केला. भारतीय अधिकाऱ्यांनी नागरिक आणि धार्मिक शरणार्थींच्या व्यापक अटक आणि हकालपट्टीला मदत केली, तसेच धार्मिक अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात केला.

या अहवालात गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. या हल्ल्यात तीन बंदूकधाऱ्यांनी मुस्लिमबहुल भागात, प्रामुख्याने हिंदू पर्यटकांच्या गटावर हल्ला केला. त्यात २६ जण ठार झाले. हल्लेखोरांनी लोकांना 'कलमा' म्हणण्यास सांगितले आणि जे तसे करू शकले नाहीत, त्यांची हत्या केल्याचे अहवालात म्हटले आहे. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात पाच दिवस संघर्ष झाला आणि देशात मुस्लिमविरोधी भावना तीव्र झाल्याचेही नमूद करण्यात आले. 'यूएससीआयआरएफ'ने पुढे सुचवले आहे, की भविष्यात अमेरिकेची सुरक्षा मदत आणि भारतासोबतचा द्विपक्षीय व्यापार धार्मिक स्वातंत्र्यातील सुधारणांशी जोडला जावा. तसेच, अमेरिकन काँग्रेसने 'ट्रान्सनॅशनल रिप्रेशन रिपोर्टिंग ॲक्ट, २०२४' पुन्हा लागू करून अमेरिकेत धार्मिक अल्पसंख्याकांना लक्ष्य करणाऱ्या कारवायांवर वार्षिक अहवाल अनिवार्य करावा, अशी शिफारस करण्यात आली आहे. 'यूएससीआयआरएफ'च्या अध्यक्षा विकी हार्टझर यांनी एका निवेदनात म्हटले, की चीनमध्ये भूमिगत चर्च सदस्यांना अटक केली जाते. तसेच भारत आणि पाकिस्तानमध्ये जमावाकडून होणारी हिंसा वाढत आहे, म्यानमारमध्ये लष्कर उपासनेच्या स्थळांवर बॉम्बहल्ले करत आहे, तर ताजिकिस्तानमध्ये पालकांना मुलांना धर्माबद्दल शिकवण्याच्या अधिकारापासून वंचित केले जात आहे. या वार्षिक अहवालानुसार, अनेक देशांमध्ये अन्यायकारक कायदे, भेदभाव, छळ, हिंसा आणि अगदी मानवतेविरुद्ध गुन्ह्यांमुळे लोकांना धार्मिक स्वातंत्र्यापासून वंचित केले जात आहे.

या पार्श्वभूमीवर, धार्मिक छळाचा सामना करणाऱ्या लोकांसाठी जागतिक स्तरावर धार्मिक स्वातंत्र्याचा प्रसार करण्याचे प्रयत्न अमेरिकेने सुरू ठेवावेत, असेही आयोगाने नमूद केले आहे. अहवालानुसार, २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपूर्वी मुस्लिम आणि इतर धार्मिक अल्पसंख्याकांविरोधात द्वेषपूर्ण भाषणांचा वापर करण्यात आला. त्यामुळे सामाजिक तणाव अधिक तीव्र झाला. निवडणुकीनंतरही ही परिस्थिती कायम राहिली आणि विविध राज्यांमध्ये अल्पसंख्याकांवरील हल्ल्यांच्या घटना घडत राहिल्या. अयोध्येतील राम मंदिरात रामाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेनंतर काही ठिकाणी निर्माण झालेला तणाव हा या पार्श्वभूमीवर अधोरेखित करण्यात आला आहे. या मंदिराचा इतिहास बाबरी मशीद विध्वंसाशी जोडलेला असल्याने, धार्मिक संवेदनशीलता अधिक तीव्र असल्याचे अहवाल सूचित करतो. या केवळ शिफारशी असून अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने त्यांना अद्याप मान्यता दिलेली नाही. 'युनायटेड स्टेट्स कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिजियस फ्रीडम' ही अमेरिकेची एक स्वतंत्र आयोग-स्वरूपाची सरकारी संस्था आहे. या आयोगात अमेरिकेतील दोन्ही प्रमुख राजकीय पक्ष रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक्सचे प्रतिनिधी असतात. या आयोगाची स्थापना १९९८ मध्ये आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य कायद्यांतर्गत करण्यात आली. ही संस्था अमेरिकेच्या परराष्ट्र विभागापासून स्वतंत्रपणे कार्य करते. 'यूएससीआयआरएफ' दर वर्षी जागतिक धार्मिक स्वातंत्र्यावर अहवाल प्रकाशित करते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक स्वातंत्र्य वाढवण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष, परराष्ट्र विभाग आणि काँग्रेस यांना धोरणात्मक शिफारशी सादर करते. 'यूएससीआईआरएफ'चा ताजा अहवाल भारत सरकारने फेटाळला आहे. मंत्रालयाने या अहवालाला मनमानी, पक्षपाती चित्रण असे संबोधत, भारतावर निवडक टीका करण्याऐवजी अमेरिकेत भारतीय वंशाच्या लोकांविरोधातील वाढती असहिष्णुता आणि धमकावण्याच्या घटनांकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे. भारतावर निवडक टीका करण्याऐवजी 'यूएससीआईआरएफ'ने अमेरिकेत हिंदू मंदिरांवरील तोडफोड, हल्ले तसेच भारतीय वंशाच्या लोकांविरोधातील वाढती असहिष्णुता आणि धमकावण्याच्या घटनांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. बांगलादेशामध्ये हिंदूंवर होत असलेल्या कथित अत्याचारांबाबतही या अहवालात उल्लेख नसल्याचीही टीका करण्यात येत आहे.

चर्चा आजची

# पुन्हा चुलीकडे वाटचाल

**वैभव पाटील**

एकीकडे केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमुळे ग्रामीण भागातील घराघरांत गॅस पोहोचला. धूरमुक्त स्वयंपाकघरामुळे महिलांचे आरोग्य सुधारले होते आणि त्यांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र, सध्या गॅस सिलिंडरचा वाढता तुटवडा आणि आवाक्याबाहेर गेलेल्या किमतींमुळे ही परिस्थिती पुन्हा एकदा मागे फिरताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठा डळमळीत झाल्याचा फटका आता थेट ग्रामीण भागातील स्वयंपाकघरांना बसू लागला आहे. परिणामी घरगुती गॅस सिलिंडरची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने गावागावात पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत. त्यामुळे पुन्हा चुलकीकडे वाटचाल होत असल्याचे चित्र ग्रामीण भागांत दिसत आहे.



गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात घरगुती गॅसचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला होता. त्यामुळे चुलीवर स्वयंपाक करण्याची पद्धत जवळपास संपुष्टात आली होती. आधुनिक जीवनशैलीमध्ये जुनी विटा मातीच्या घरांची जागा सिमेंटच्या आरसीसी इमारतींनी घेतली. सारवलेल्या जमिनीऐवजी गुळगुळीत फरशी चमकू लागली. शहरीकरणाची छाप ग्रामीण भागातही पडू लागल्याने गावखेड्यातही सिमेंटच्या इमारती वाढू लागल्या. त्याचबरोबर सोयीसुविधांची भुरळ पडू लागल्याने ग्रामीण संस्कृतीची छाप कमी होऊ लागली. तसेच, जुनी व पारंपरिक स्वयंपाकघरांची जागा मॉडर्न किचनने घेतली. त्यामुळे घराचे घरपण जपणारी चूल कालबाह्य झाली. अनेक घरांतून चूल नाहीशीच झाल्याने नवीन पिढीला चूल कशी पेटवायची, हेदेखील माहिती नाही. परंतु, सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याचा परिणाम ग्रामीण भागातील वितरण व्यवस्थेवर होत असल्याचे सांगितले जात आहे.

त्यामुळे घरघुती गॅससाठी तब्बल ४५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागत असल्याने गृहिणींचा संयम सुटू लागला आहे. शहरी भागात साधारण ३० दिवसांच्या आत गॅस सिलिंडर मिळत असताना, ग्रामीण भागातील ग्राहकांना मात्र ४५ दिवसांपर्यंत वाट पाहावी लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे. गॅस वेळेवर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर पुन्हा चुली पेटवण्याची वेळ आली आहे.अशा परिस्थितीत ग्रामीण भागात मात्र गॅसटंचाईवर मात करत चुलीसाठी लाकूड फाट्याची जुळवाजुळव सुरू झाली आहे. परंतु, चुलीसाठी लागणारे लाकूडही सहज उपलब्ध होत नसल्याने गृहिणींची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. अनेक वर्षांपासून गॅसवर स्वयंपाक करण्याची लागलेली सवय आता अचानक मोडावी लागत असून, चुलीसाठी उन्हातान्हात भटकत सरपण गोळा करण्यासाठी त्यांना माळरानावर जावे लागत आहे. परंतु, मोठ्या प्रमाणात झालेली वृक्षतोड पाहता वाळलेले सरपणही तेथे उपलब्ध नाही.

तत्पुर्वी चुलीच्या धुरामुळे डोळ्यांचे व श्वसनाचे आजार बळावत असल्याने गरीब कुटुंबातील महिलांसाठी शासन गेली अनेक वर्षे उज्ज्वला गॅस योजनेद्वारे कमी दरात गॅस सिलिंडर उपलब्ध करत आहे. परंतु, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस सिलिंडरचा पुरवठा डळमळीत झाल्याने देशात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे चुलीचा वापर पुन्हा सुरु होत असल्याने उज्वला गॅस योजनेचा उद्देश फोल ठरत आहे. तसेच, चुलीच्या सरपणासाठी वृक्षतोड व पर्यावरण ऱ्हास होण्याचा धोका संभवत आहे. दरम्यान, उज्वला योजनेतून ग्रामीण भागात गॅस जोडण्या देऊन चुली बंद झाल्याचा सरकारचा दावा असतानाच आज पुन्हा गावागावात चुली पेटू लागल्याचे चित्र दिसू लागले आहे.

देशात स्वयंपाकाच्या गॅसची टंचाई जाणवत असतानाच या परिस्थितीचा गैरफायदा घेतला जात असून गॅस सिलिंडरचा काळा बाजारही होऊ लागला आहे. बुकिंग होत नसल्याने साठेबाजांकडून गॅस सिलिंडरसाठी अव्वाच्या सव्वा रक्कम घेतली जात आहे. शहरातील नोकरदार वर्गाला नाहिलाजास्तव चढ्या किमतीचे गॅस सिलिंडर घेण्यासाठी भाग पाडले जात आहे. परंतु, ग्रामीण भागातील शेतकरी व मध्यमवर्गीयांना याचा चांगलाच फटका बसत आहे. परिणामी स्वयंपाक घराचे कामकाज व आर्थिक बजेट दोन्हीही कोलमडू लागले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गृहीणांदेखील नाहिलाजास्तव चुल फुंकायला भाग पडावे लागत आहे. गॅस पुरवठा त्वरित सुरळीत न झाल्यास, आगामी काळात ग्रामीण भागात पुन्हा मोठ्या प्रमाणावर चुली पेटण्याची भीती व्यक्त होत आहे. चुलीवर स्वयंपाक करताना होणारी डोळ्यांची जळजळ, श्वसनाचे त्रास आणि आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम, तसेच लाकूडफाटा गोळा करण्यासाठी होणारी धावपळ आणि वाया जाणारा वेळ यामुळे गृहिणींमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे गॅस टंचाईचा हा भडका लवकर शांत झाला नाही, तर स्वयंपाकघरांमध्ये पुन्हा चुलीचा काळ परत येणार का? असा प्रश्न गृहिणींसह सर्वसामान्यांना पडत आहे.

लोकसंसद

## एआय डेटा सेंटर्समुळे होतेय जागतिक तापमानवाढ!



केंब्रिज विद्यापीठाच्या संशोधनानुसार जगभर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत असल्याचे समोर आले आहे. या संशोधनानुसार गेल्या २० वर्षात जगभरातील सहा हजारहून अधिक एआय डेटा सेंटर्सच्या परिसरात झालेल्या हवामानातील बदलांचा सखोल अभ्यास आणि विश्लेषण करण्यात आले आहे. जागतिक तापमानवाढीसाठी कारणीभूत असलेले घटक बाजूला ठेवून केवळ डेटा सेंटर्सच्या पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास केला असता तापमानात २ अंश सेल्सिअसपर्यंत वाढल्याचे दिसून आले आहे. शास्त्रज्ञांनी या परिणामाला 'डेटा हीट आयलंड इफेक्ट' असे नाव दिले असून यामध्ये एआय सर्व्हर्स आणि कूलिंग सिस्टिम्समधून २४ तास मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या उष्णतेमुळे केवळ डेटा सेंटर्सच्या आसपासच नाहीतर डेटा सेंटर्सपासून १० किलोमीटरच्या परिसरातही तापमानात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. या अभ्यासानुसार जगभरातील अंदाजे ३४.४ कोटी लोक या डेटा सेंटर्सच्या उष्ण असलेल्या संवेदनशील भागात राहतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकूणच एकीकडे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञान प्रगत आणि बहु उपयोगी असले तरी प्रत्यक्षात प्रचंड खर्चिक आणि ग्लोबल वॉर्मिंगचा ताण वाढवणारे आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

दिनविशेष

# इंग्रजांविरुद्ध क्रांतीचं पहिलं पाऊल उचलणारे क्रांतिकारक मंगल पांडे

भारतीय इतिहासात अनेक महान क्रांतिकारकांचा जन्म झाला आहे, ज्यांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या प्राणाचा बलिदान केला मंगल पांडे हे भारताचे पहिले स्वातंत्र्यसैनिक म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत म्हणजेच मंगल पांडे हे भारताचे पहिले स्वातंत्र्यसैनिक आहेत. मंगल पांडे यांनी सर्वप्रथम इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. मंगल पांडे यांचे स्वातंत्र्यसैनिक होण्याचे उद्दिष्ट फक्त आणि फक्त भारतातील निष्पाप जनतेची ब्रिटीश राजवटीतून सुटका करणे हेच होते. मंगल पांडे यांनी सुरू केलेला हा स्वातंत्र्यलढा थांबवण्यासाठी इंग्रजांनी खूप प्रयत्न केले, पण मंगल पांडे यांना पाहून संपूर्ण भारतातील नागरिकांच्या मनात ब्रिटीश राजवटीविरुद्ध क्रांतिकारकाची भावना जागृत झाली. मंगल पांडे यांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सुरुवातीपासून असे अनेक शूर क्रांतिकारक भारतात जन्माला आले, ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारत इंग्रजांच्या तावडीतून मुक्त झाले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यवीर मंगल पांडे यांचा जन्म बिहारमधील बलिया जिल्ह्यातील नगवा नावाच्या गावात झाला. सध्या हे ठिकाण उत्तर प्रदेशातील ललितपूरजवळ आहे. मंगल पांडे यांचा जन्म १९ जुलै १८२७ रोजी ब्राह्मण कुटुंबात झाला. मंगल पांडे यांच्या वडिलांचे नाव श्री दिवाकर पांडे होते, ते पंडित होते म्हणजे पूजा वगैरे करायचे. तर आईचे नाव श्रीमती अभय राणी होते, मंगल पांडे आपल्या सुरुवातीच्या आयुष्यात ईस्ट इंडिया आर्मीमध्ये सामील झाले होते. मंगल पांडे यांना ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात पायदळात शिपाई करण्यात आले. मंगल पांडे ब्रिटीश राजवटीत सैन्यात भरती झाल्यावर भारतात नवीन प्रकारची रायफल सुरू झाली. ज्यावेळी ही रायफल लाँच करण्यात आली, त्यावेळी तिचे नाव एनफिल्ड रायफल असे होते. त्यावेळी या रायफलमधील ग्रीस प्राण्यांच्या चरबीपासून बनवल्याची अफवा पसरली आणि मंगल पांडे हे प्राणी गायी आणि डुक्कर असल्याचे कळताच संतापले. या रायफलमधील वंगण तोंडातून काढून टाकावे लागले, अशा प्रकारे हिंदू-मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक श्रद्धांशी खेळल्याने मंगल पांडेला खूप राग आला आणि त्याने इंग्रजांचा बदला घेण्याचा विचार केला. रायफलच्या ग्रीसमध्ये प्राण्यांच्या चरबीचे काडतूस वापरल्याच्या निषेधार्थ मंगल पांडे यांनी २९ मार्च १८७५ मध्ये एका ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले. बंगालच्या बॅरकपूर कॅन्टोन्मेंटमध्ये मंगल पांडे या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या झाली. मंगल पांडेने ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यावर भरदिवसा गोळ्या झाडल्या. मंगल पांडेने त्या ब्रिटीश अधिकाऱ्याला गोळी मारल्यानंतर स्वत:वर गोळी मारण्याचा प्रयत्न केला, पण त्या पूर्वीच त्यांना एका ब्रिटिश अधिकाऱ्याने पकडल. मंगल पांडे यांना स्वत:वर गोळी झाडायची होती कारण त्यांना कोणत्याही ब्रिटीश शासकाच्या हातून आपला जीव द्यायचा नव्हता, पण त्याचा प्रयत्न फसला आणि ते ब्रिटिश अधिकाऱ्याच्या हाती पकडले गेले.

या घटनेसाठी मंगल पांडे यांना तुरुंगात टाकण्यात आले होते, जिथे त्यांना बरे होण्यासाठी जवळपास एक आठवडा लागला. असे म्हटले जाते की मंगल पांडे यांना कोणत्याही प्रकारचे औषध दिले गेले नाही, कारण त्यांनी एका ब्रिटीश अधिकाऱ्याची हत्या केली होती आणि त्यासाठी त्यांना शिक्षा दिली होती. यानंतर मंगल पांडेला न्यायालयात हजर करण्याचा निर्णय देण्यात आला. कोर्टाच्या निर्णयानंतर ६ एप्रिल १८५७ रोजी मंगल पांडेला १८ एप्रिलला फाशी देण्यात यावी, असा आदेश कोर्टाने दिला होता. मंगल पांडे यांचा धाक होता. इंग्रज अधिकारी त्यांना घाबरायचे. अखेर मंगल पांडे यांना १८ एप्रिल ऐवजी ८ एप्रिलला फाशी दिली. मंगल पांडेची भीती अधिकाऱ्यांना वाटायची की मंगल पांडेच्या मृत्यूनंतरही त्यांच्या मृतदेहाजवळ जाण्यास इंग्रज घाबरत होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर, मंगल पांडे यांचा भारत सरकारने सन्मान केला, मंगल पांडे यांना भारत सरकारने ५ ऑक्टोबर १९८४ मध्ये हा सन्मान दिला होता.

# अनधिकृत बांधकामांना ऊत

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

सध्या श्रीवर्धन तालुक्यामध्ये अनधिकृत बांधकामांना ऊत आला आहे. महसूल प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे अनेक ठिकाणी नवीन अनधिकृत बांधकामे उभी केली जात आहेत. ही बांधकामे करणारे स्थानिक कमी असून बाहेरून आलेले धनदांडगेच असल्याचे पाहायला मिळत आहे. यामध्ये अनेक ठिकाणी वनविभागाचा शिक्का असलेल्या जागांवरती देखील बांधकाम करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या परवानगीशिवाय वनैतर कामास बंदी अशा प्रकारचे शिक्के असलेल्या जागांवरती देखील मोठमोठे बंगले उभे राहत आहेत. महसूल प्रशासन आणि वनविभाग यांचा ही अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना आशीर्वाद आहे का? असा प्रश्न जागरुक नागरिकांना पडला आहे.



● महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष

श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी गावाचे हद्दीमध्ये गट क्रमांक ८८ येथे शेखाडी व भरडखोल या दरम्यान रस्त्याच्या डाव्या बाजूला एका बाहेरगावच्या धन दांडग्याने मोठमोठे बंगले उभे केले आहेत. हे बंगले पर्यटकांना भाडेतत्त्वावर देण्यासाठी उभे केलेले असून उंच डोंगरावरून समुद्र दिसत असल्यामुळे या बंगल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशाच प्रकारेच श्रीवर्धन तालुक्यातील आरावी व कोंडवील बीचवरती देखील मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. या रिसॉर्ट किंवा हॉटेलमध्ये जाण्यासाठी वन खात्याचा जागेचा सर्रासपणे वापर करण्यात आलेला आहे. मात्र, याबाबतीत वनविभाग मूग गिळून गप्प असल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, अशी अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना महसूल प्रशासन आणि वनविभाग यांचा आशीर्वाद तर नाही ना? असा प्रश्न जागरुक नागरिकांना पडला आहे.

### वनसंपत्ती धोक्यात

श्रीवर्धन तालुक्याला ५२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. मात्र तालुक्यातील बहुतांश समुद्रकिनाऱ्यांच्या ठिकाणावरती सीआरझेड कायद्याचे सर्रासपणे उल्लंघन करून बांधकामे उभी राहत आहेत. ही अनधिकृत बांधकाम करणारे बांधकाम करण्यासाठी नैसर्गिक डोंगरांचा ऱ्हास करत असून त्यामुळे या ठिकाणची वनसंपत्ती धोक्यात येत आहे. तरी महसूल प्रशासनाने व वन विभागाने सदर अनधिकृत बांधकाम करण्याऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ एप्रिल

१) श्रीम.मीनल नंदकुमार डोळस विद्यानगर, अलिबाग, ८-४-१९४९
२) श्री.सीताराम बाळू भगत मु.वाडगाव, अलिबाग, ८-४-१९५३
३) श्री.महेश पांडुरंग वैद्य नागाव, अलिबाग, ८-४-१९५०
४) श्री.प्रवीण पितांबर दास शहा चेंढरे, अलिबाग, ८-४-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**सिताराम बाळू भगत, वाढदिवस अलिबाग**



**कै. अनुसया विठोबा पाटील समरणार्थ**

**राजेंद्र दत्तात्रय वेळे, स्मरणार्थ, वायशेत, अलिबाग**

## बहिरीदेवाचा पालखी सोहळा

**। खारेपाट । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बहिरिचा पाडा येथील श्री बहिरिदेवाचा भव्य पालखी सोहळा व यात्रा उत्साहात पार पडली. यावेळी रायगड जिल्ह्यासह ठाणे, मुंबई, पुणे राज्यभरातून हजारोंच्या संख्येने भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी भव्य उंच काठ्यांची स्पर्धा पार पडली. त्यानंतर गेली २०० वर्षांची परंपरा असलेल्या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे श्री बहिरिदेवाच्या भव्य पालखी सोहळ्याला पाटील देव्हाऱ्यातून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी श्री बहिरीदेव मंदिराचे अध्यक्ष हरिचंद्र पाटील, भालचंद्र पाटील, प्रशांत पाटील, राजेश पाटील, चंद्रकांत पाटील व श्री बहिरीदेव मंदिराची सर्व इनामदार व ग्रामस्थ मंडळ बहिरिचापाडा यांचे सहकार्य लाभले. विशेष म्हणजे पालखी सोहळ्यात भाविक काटेरी पेरी पाठीवर मारण्याची प्रथा आणि अनेक वर्षांची असून हे मोठ आकर्षण पाहण्यासाठी राज्यभरातून भाविक येतात. यावेळी महिलांनी पारंपरिक नृत्य करीत ढोल, ताशा वाद्यांच्या गजरात सोहळा दिमाखात साजरा करण्यात आला. रात्री सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

## महावितरणकडून विद्युत सुरक्षेचा जागर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इक्रम) वतीने गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इक्रमेक्स-२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. महावितरणच्या या प्रदर्शनाला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री मा. श्रीपाद नाईक यांनी शनिवारी (दि.४) भेट देत विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली.

गोरेगाव येथे 'इक्रमेक्स-२०२६'चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक यांच्या हस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा, असे आवाहन नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी सांगितले की, ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला गती दिली आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतल्याचे पवार यांनी सांगितले.

## नवी मुंबई परिवहन सेवा विस्कळीत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा कारभार सध्या विस्कळीत होत असल्याचे चित्र समोर येत आहे. विशेषतः सकाळच्या गर्दीच्या वेळेत खोपोलीकर्जत मार्गावरील बस वारंवार बंद पडत आहेत. त्यामुळे चाकरमानी, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिला वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

चालत्या बसमध्ये अचानक बिघाड होऊन प्रवाशांना मध्येच उतरावे लागते. त्यामुळे वेळेवर कामावर किंवा महाविद्यालयात पोहोचणे कठीण होत आहे. सोमवारी (दि.६) पळसपे फाटा तर मंगळवारी




● प्रवाशांचे हाल
● प्रशासनावर प्रश्नचिन्ह

ठाणा नाका येथे बस सेवा बंद पडली. या समस्येमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोट्यवधी रुपयांचा अर्थसंकल्प असतानाही परिवहन सेवेच्या देखभालीकडे दुर्लक्ष का होत आहे?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नवीन बस ताफ्यात दाखल झाल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात त्याचा फायदा प्रवाशांना होताना दिसत नाही.

डेपोमधून बस सुटण्यापूर्वी त्यांची योग्य तपासणी केली जाते का, याबाबतही शंका उपस्थित होत आहे. दरम्यान, ही समस्या तातडीने सोडवून बससेवा सुरळीत करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.

## अमेरिकेबरोबरचा व्यापार करार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मोदी सरकारने अमेरिकेबरोबर व्यापार करार करून भारताचा स्वाभिमान गहाण ठेवला आहे. हा व्यापार करार भारतातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा आहे. आपल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेबरोबर करार करून जनतेला वेठीस धरले आहे, असा हल्लाबोल मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

भारत अमेरिका व्यापारी कराराविरोधात मुंबई युवक काँग्रेसने प्रेस क्लबजवळील मुंबई काँग्रेसचे कार्यालय राजीव गांधी भवन येथे न्याय सत्याग्रह आंदोलन केले. यावेळी बोलताना खा. वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, अमेरिकेने लावलेल्या टेरीफमुळे असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असताना या करारामुळे त्यांना आणखी नुकसान सोसावे लागणार आहे. मोदी सरकार शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना भरीव मदत करत नाही. अर्थसंकल्पातूनही शेतकऱ्यांना काहीच मिळाले नाही. इराण अमेरिका युद्धाचे भारताला चटके बसू लागले आहेत. इंधन व गॅसच्या

● खासदार वर्षा गायकवाडांचा हल्लाबोल

टंचाईमुळे सिलेंडरसाठी रांगा लावाव्या लागत आहेत. मुंबईतील हॉटेल्स व व्यावसायिकांना गॅस मिळत नसल्याने व्यवसाय बंद करावे लागत आहेत. घरगुती गॅसही मिळत नाही. काळा बाजार वाढला आहे. इतर राज्यातून मुंबईत कामासाठी आलेल्यांचेही गॅस अभवी प्रचंड हाल होत आहेत. गॅसबरोबर पाण्याची टंचाई आहे. परंतु, पंतप्रधान मोदी मात्र जनतेच्या या विषयांवर काहीच बोलत नाहीत, असेही त्या म्हणाल्या.




## खरवई येथील विद्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती

### रोटरी क्लब मुंबई, मुलुंड ईस्टचा पुढाकार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापुर तालुक्यातील ग्रामीण खरवई गावातील स्व. मॉ. मीनाताई ठाकरे विद्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती व येथील विद्यार्थ्यांना मुबलक पाणी मिळावे, यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रतिश कांबळे यांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने रोटरी क्लब मुंबई, मुलुंड ईस्ट यांच्या माध्यमातून या विद्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती करून नवे रूप दिले. तसेच, विद्यालयासाठी स्वतंत्र बोरवेल मारून दिल्याने रोटरी क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आभार मानत सामाजिक कार्यकर्ते प्रतिश कांबळे यांच्या कामगिरीचेही कौतुक केले.

बीडखुर्द, जांबरुंग पंचक्रोशीतील गोरगरीब व आदिवासी ठाकूर समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी स्व.मॉ.मीनाताई ठाकरे विद्यालय प्रामुख्याने काम करत आहे. येथील अनेक अडचणींना सामना देत या विद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्याचे काम करत असून या विद्यालयाची इमारत नादुरुस्त झाली होती. काही संस्थांनी पुढाकार घेत इमारतीच्या काही भागाची दुरुस्ती करून दिली होती. तर उर्वरित इमारतीची दुरुस्ती व्हावी, यासाठी जाबरुंग येथील सामाजिक कार्यकर्ते प्रतिश कांबले यांनी पुढाकार घेत रोटरी क्लब मुंबई, मुलुंड ईस्ट यांच्या माध्यमातून इमारतीची दुरुस्ती करून घेतली. त्यामुळे विद्यालयाच्या इमारतीला नवी झळाली मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळाला. त्याचबरोबर येथील विद्यार्थ्यांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे, यासाठी रोटरी क्लबच्या माध्यमातून बोरवेल ही मारून दिली. त्यामुळे पुढील काळात येथील विद्यार्थ्यांना स्वच्छ व मुबलक पाणी मिळणार आहे.

## हनुमान मंदिर जीर्णोद्धार सोहळ्याचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावमधील श्री क्षेत्र कोशिंबळे तर्फे तळे येथे श्री हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य धार्मिक सोहळा गुरुवार दि.९ एप्रिल ते शनिवार दि.११ एप्रिल या तीन दिवसाच्या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांसह भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

या कार्यक्रमाची जय्यत तयारी कोशिंबळे ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ, मुंबईकर मंडळ कोशिंबळे, संजयदादा मित्र मंडळ कोशिंबळे, जय महाराष्ट्र क्रिकेट संघ कोशिंबळे व्यवस्थापक मंडळांनी केली आहे. या व्यवस्थापक मंडळाकडून या कार्यक्रमासाठी येणाऱ्या सर्व भाविक पाहुण्यांचे तसेच देणगीदारांचे खास आभार मानले असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. या पवित्र धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी परिसरातील तसेच बाहेरील सर्व भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.

## 'विज्ञान तरंग' साप्ताहिक कार्यक्रम

**अलिबाग :** हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त मराठी विज्ञान परिषद, 'विज्ञान तरंग' हा ऑनलाइन साप्ताहिक कार्यक्रम सुरु करत आहे. ६ एप्रिल २०२६ पासून दर सोमवारी दुपारी ४ ते ४.४० हा कार्यक्रम झूम माध्यमावर सादर होणार आहे. विविध विषयांवर वैज्ञानिक माहिती देणारा हा कार्यक्रम विनामूल्य असून सर्वांसाठी खुला असणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याकरिता मिटिंग आयडी ८४२४७२३७४७५, याचा किंवा ७३२२९० या पासकोडचा वापर करावा.

## निवडक

### विठ्ठलवाडीत अखंड हरिनाम सप्ताह

**मुंबई :** महाड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे विठ्ठलवाडी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला १०७ वा अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. या धार्मिक सोहळ्यात गावातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सप्ताह काळात दररोज पहाटे काकड आरती, त्यानंतर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, तसेच सायंकाळी हरिपाठ, हरिकीर्तन व हरिजागराचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. महाराष्ट्रातील कीर्तनकार व प्रवचनकार यांच्या प्रभावी कीर्तनसेवेने भाविक मंत्रमुग्ध झाले. विविध गावांतील भजन मंडळांनी सादर केलेल्या हरिजागरामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सप्ताहाच्या सांगता दिनी विशेष कीर्तनसेवा, महाप्रसाद व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण सोहळ्याच्या आयोजनासाठी विठ्ठलवाडी महिला मंडळ, युवक तसेच सर्व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.



### 'ज्येष्ठांना दिलासा देणे आपले कर्तव्य'



**रोहा :** ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक काम अत्यंत उत्तम चालले आहे. संस्थेच्या माध्यमातून निरनिराळे स्तुत्य उपक्रम राबविले जात आहेत. मात्र वाढत्या वयामुळे ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना मदत करून दिलासा देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, असे रोहे ज्येष्ठ संघटनेचे अध्यक्ष पी.बी. सरफळे यांनी ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित केलेल्या सभेत बोलताना सांगितले. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष एस.एन. गायकवाड, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, महंमदशेठ डबीर, शरद गुडेकर, अशोक जोशी, दत्तात्रेय तवटे, अनुराधा धुमाळ, शैलजा सुभाष देसाई, नंदकुमार भादेकर व शेखर गुंड असे सुमारे १०० सदस्य उपस्थित होते. आपले मनोगत व्यक्त करताना पी.बी. सरफळे पुढे म्हणाले, आपल्या संघटनेमार्फत ज्येष्ठ नागरिकांचे वाढ दिवस साजरे करणे. त्यानिमित्ताने त्यांना श्रीफळ व गुलाब पुष्प प्रदान करून अभिष्टचिंतनाच्या शुभेच्छा दिल्यामुळे समाधान मिळते. तसेच इतर संघटनेकडून ज्येष्ठ नागरिकांना चालणे सुलभ व्हावे म्हणून स्टिक व आरोग्यासाठी मोफत उपचार आरोग्य तपासणी केली जाते. त्यामुळे खूप समाधान मिळते. शासकीय कामे, प्रवास आणि इतर आवश्यक कामे संघटनेमार्फत करण्याचे अध्यक्ष पी. बी. सरफळे रावसाहेब यांनी सभेत सांगितले.




### पालक पाद्यपूजन उपक्रम उत्साहात

**मुंबई :** रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि सेंट झेवियर्स स्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने शांतीचा मार्ग या संकल्पनेतून पालक पाद्यपूजन हा एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. पालक पाद्यपूजन म्हणजे विद्यार्थ्यांची पालकांविषयी असलेली कृतज्ञता. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सेंट झेवियर्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी राबवलेला उपक्रम. विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या पालकांना निमंत्रित केले होते. भरलेल्या सभेत मुलांनी आपल्या माता-पित्यांचे पाय धुवून त्यांचे पाद्यपूजन केले. आपल्या मुलांकडून मिळणारा हा सर्वोच्च मान पाहून अनेक पालकांचे डोळे भरून आले. कौटुंबिक संस्कार आणि कृतज्ञतेचे हे दर्शन सर्वांच्या हृदयाला स्पर्श करून गेले. संस्थाचालकांकडून कर्मचाऱ्यांचा सन्मान केवळ पालकांप्रतीच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक घटकाप्रती नम्रता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्यात एक आगळावेगळा पायंडा पाडण्यात आला. संस्थेच्या विश्वस्तांनी आणि व्यवस्थापन समितीने शाळेतील सर्व शिक्षक तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे पाय धुवून त्यांचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान घेऊ नये, तर नम्रता म्हणजे काय असते, याचा जिवंत आदर्श व्यवस्थापनाने स्वतःच्या कृतीतून विद्यार्थ्यांसमोर ठेवला. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता समाजाचा कणा असलेल्या पंचायत समिती, तहसील कार्यालय, नगरपालिका आणि पोलीस विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमात विशेष मान देण्यात आला.

### भेलोशी येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**मुंबई :** भेलोशी येथे समृद्धी ग्राम उत्कर्ष मंडळ-भेलोशी यांच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. सोहळ्याचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले. मंडळाच्या शिस्तबद्ध आणि नियोजनात्मक संयोजनामुळे कार्यक्रमाने वेगळीच उंची गाठली होती. या उत्साहात ३५० माहेरवाशीणींना माहेरची साडी देऊन त्यांचा विशेष सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळ पंचक्रोशीतील व



विभागातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. श्री हनुमान मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत हरिपाठ, नाम जप, भजन, कीर्तन, प्रवचन व ग्राम प्रदर्शन दिंडी सोहळा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामूहिक पारायण, सामूहिक नामजप, यासह नागरिक व भेलोशी गावच्या माहेरवाशीण यांचा सन्मान सोहळा, सद्गुरू सदाशिव मोरे (खेड), खुटील दत्तवाडी ग्रामस्थ, नरवण व चांदणीकोंड महिला मंडळ आदींचा मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यादरम्यान भेलोशीतील माहेरवाशिणींन भगिनींकडून ४० खुर्च्या, पोडीयम/डाईज, इन्वर्टर या प्रसंगी भेलोशी मंडळाला सुपूर्द केले. पंचक्रोशीतील शेकडो भाविकांनी सहभागी होऊन कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण गाव शहरवासियांसह पाहुणे मंडळींनी गजबजला होता. तीन दिवसीय या कार्यक्रमाने गावामध्ये भक्तीमय वातावरण पसरले होते.

**स्वदेस फाऊंडेशनचा मदतीचा हात | सात तालुक्यांतील विद्यार्थ्यांना मिळणार भरघोस शिष्यवृत्ती**

## उच्च शिक्षणाचे स्वप्न होणार साकार

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील गुणवंत परंतु आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला बळ देण्यासाठी रॉनी आणि झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाऊंडेशनने मदतीचा हात पुढे केला आहे. रायगड जिल्ह्यातील सात तालुक्यांतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष स्वदेस शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली. यामुळे डॉक्टर, इंजिनिअर आणि वकील बनण्याचे ग्रामीण विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

स्वदेस फाऊंडेशनच्या वतीने माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आणि सुधागड या



तालुक्यांमध्ये गाव विकास समित्यांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे कार्य सुरू आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आतापर्यंत १०६१ विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीच्या जोरावर आपले उच्च शिक्षण पूर्ण करून नामांकित क्षेत्रात नोकरी मिळवली आहे.

अधिक माहितीसाठी स्वदेस फाऊंडेशनचे विनोद पाटील (९२७२००६७४३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण विभाग प्रमुख रंजीश कट्टाडी यांनी केले आहे.

### या कोर्सेससाठी आर्थिक साहाय्य

१२ वी नंतर पुढील क्षेत्रांत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाईल. वैद्यकीय क्षेत्र: MBBS, BAMS, BDS, BPT, नर्सिंग, फार्मसी. अभियांत्रिकी: पदवी, पदविका आणि आर्किटेक्चर. वाणिज्य व विधी: CA, CS, B.Com (Accountancy), LLB, LLM. इतर: हॉटेल मॅनेजमेंट आणि फॅशन डिझायनिंग.

### अर्ज प्रक्रिया, निवड

स्वदेस फाऊंडेशनने दिलेल्या कोड स्कॅन करून ५ मे २०२६ पूर्वी ऑनलाईन माहिती भरावी. अर्जांची छाननी केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या दोन मुलाखती घेतल्या जातील. त्यामध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड होईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी आणि वसतिगृहाचा खर्च लक्षात घेऊन शिष्यवृत्तीची रक्कम थेट दिली जाईल.

### शिष्यवृत्तीसाठी कोण पात्र आहे?

विद्यार्थी रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आणि सुधागड येथील रहिवासी असावा. त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८.५ लाख रुपयांच्या आत असावे. १२ वी (कला, वाणिज्य, विज्ञान) मध्ये स्वदेस कार्यक्षेत्रातील गावातील विद्यार्थ्यांना ६०%, तर इतर गावांतील विद्यार्थ्यांना ७०% गुण अनिवार्य आहे.

## निवडक



### मानसीचे पोलीस भरतीत देदीप्यमान यश

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या आदगाव कुणबीवाडी येथील मानसी पाटील हिने आपल्या कष्टाच्या जोरावर खाकी वर्दीला गवसणी घातली आहे. तिची निवड पालघर पोलीस दलात झाली आहे. तिच्या या यशाने संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यात आनंदाची लाट उसळली आहे. मानसीचा हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. दुर्गम भागातून मुंबईच्या उपनगरातील नालासोपारा गाठणे आणि तिथे प्रहार अकॅडमीमध्ये सलग तीन वर्षे घाम गाळणे, ही तिची मोठी तपश्चर्या ठरली. पहाटेचा सराव असो किंवा रात्रीचा अभ्यास, मानसीने कधीच थकवा जाणवू दिला नाही. तीन वर्षांच्या या प्रवासात अनेकदा अपयशाचे डोंगर समोर आले, पण मानसीने आपली जिद्द ढळू दिली नाही. एका सर्वसाधारण कुटुंबात वाढलेल्या मानसीच्या मागे तिचे आई-वडील खंबीरपणे उभे राहिले. प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही त्यांनी मुलीच्या शिक्षणात आणि सरावात कोणतीही कसर पडू दिली नाही. माझ्या आई-वडिलांचे कष्ट आणि त्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचू शकले, अशा शब्दांत मानसीने आपल्या भावना व्यक्त केल्या.

### कर्जतमध्ये डायलिसिस सेंटर सुरू

**नेरळ** : कर्जत उपजिल्हा रुग्णालय येथे डायलिसिस सेंटर उद्घाटन आ. महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे यांनी डायलिसिस सेंटर ही अभिमानाची गोष्ट असून आवश्यक अशी सेवा असल्याचे सांगितले. जिल्ह्यात सात ठिकाणी अशी सेवा सुरू होत असून पूर्वी आपल्या जिल्ह्यातील रुग्णांना मुंबईमध्ये जाऊन डायलिसिस घ्यावे लागत होते. याचवेळी ग्रामीण रुग्णालयात देखील डायलिसिस सेवा दिली जात असून संपूर्ण जिल्ह्यात अशी सेवा देण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाच्या पुढाकाराने राज्यात शासनाच्या सरकारी रुग्णालयात डायलिसिस सेवा सुरू झाली आहे. शासनाच्या भूमिकेमुळे खासगी रुग्णालयात जाण्याचा आणि आर्थिक भुर्दंड घेण्याचा त्रास आता कमी झाला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण शिंदे, कर्जत रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. विजय मस्कर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव, संकेत भासे, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, अभिषेक सुर्वे, भास्कर देसले, रमाकांत जाधव, नईम खान, महेंद्र निगुडकर, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जुने माणगाव येथे जत्रोत्सवाचे आयोजन

**माणगाव** : माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव संगमेश्वर नगर येथील हनुमान मंदिराचा जत्रोत्सव कार्यक्रम गुरुवारी(दि.९) एप्रिल रोजी होणार आहे. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जत्रोत्सव कमिटीचे प्रमुख सुभाष पारखे व सहकाऱ्यांनी केले आहे. जुने माणगाव संगमेश्वर नगर येथील हनुमान मंदिराचा हा जत्रोत्सवाचा कार्यक्रम ग्रामीण भागातील लोकांसाठी व यात्रेकरूंसाठी एक आकर्षण असते. खेडोपाड्यातून यात्रेकरू या यात्रेसाठी आवर्जून येत असतात. याठिकाणी वाकडाई देवी उतेखोल येथून पालखी तसेच काही गावांतून मानाच्या जत्तर काठया येत असतात. विविध प्रकारच्या दुकानांनी तसेच खेळांच्या साधनांनी हि यात्रा सजलेली असते. दरवर्षी मोठ्या उत्साहात व शांततेत हि यात्रा संपन्न होते. यावर्षीही या जत्रोत्सवामध्ये यात्रेकरूंनी मोठया संख्येने सहभागी होऊन जत्रोत्सवाचा आनंद लुटावा असे आवाहनही जत्रोत्सव कमिटी जुने माणगाव यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

### बाबासाहेबांच्या बॅनरने वेधले लक्ष

**नेरळ** : कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या डिकसळ शांतीनगर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त एक विशेष उपक्रम राबवण्यात आला आहे. येथील शांतीदूत मंडळ आणि रमाबाई महिला मंडळाच्या वतीने ७० फूट लांब आणि ८ फूट उंच असा भव्य ऐतिहासिक परिचय देणारा बॅनर लावण्यात आला असून, सध्या हा बॅनर संपूर्ण तालुक्यात चर्चेचा आणि आदराचा विषय ठरत आहे. या भव्य बॅनरचे वैशिष्ट्य म्हणजे याची आकर्षक मांडणी आणि डिझाईन पुणे येथे करून घेण्यात आली आहे, तर याची छपाई कर्जत शहरात करण्यात आली आहे. हा बॅनर केवळ शुभेच्छा देणारा नसून, तो एक माहितीचा खजिना ठरत आहे. या ७० फुटी बॅनरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संपूर्ण परिचय देण्यात आला आहे. बाबासाहेबांनी केवळ एका समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी आणि देशासाठी जे अतुलनीय कार्य केले, त्याची सविस्तर यादी यावर मांडण्यात आली आहे. संविधानाची निर्मिती, महिलांचे अधिकार, कामगारांचे प्रश्न आणि सामाजिक न्याय या विषयावर त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेतल्यामुळे हा बॅनर येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत आहे. दरम्यान हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शांतीदूत मंडळ आणि रमाबाई महिला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली आहे. कर्जत तालुक्यात अशा स्वरूपाचा माहितीपूर्ण बॅनर पहिल्यांदाच लावण्यात आल्याने, हा उपक्रम इतर मंडळांसाठी आदर्श ठरत असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **उजाला ज्योतिष व इंग्लिश स्पीकिंग** क्लास, कायदेशीर सल्लागार, डोंबिवली, श्रीवर्धन- ९३२४९८७०५०

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# उरणकरांचे १०० खाटांचे रुग्णालय कागदावरच




**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरणकरांसाठी प्रस्तावित असलेल्या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा खर्च मागील १५ वर्षांच्या कामाच्या विलंबामुळे ५८ कोटी खर्चाचे काम ८२.५४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. त्यातच सिडकोने रुग्णालयासाठी दिलेल्या ५९०० चौमी जागेपैकी ९८० चौमी जागा सीआरझेडच्या कचाट्यात सापडली आहे. वर्षभरातही सीआरझेडच्या जागेचाही तिढा सुटलेला नाही. यामुळे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचे काम अद्यापही कागदावरच आहे. उरणच्या रुग्णालयातील डॉक्टरांच्या संख्येत वाढ झालेली नाही. याचा विपरीत परिणाम रुग्णसेवेत होत असुन रुग्णांना उठसूठ उपचारासाठी नाहक नवीमुंबई, पनवेल, मुंबईची वाट धरावी लागत आहे. यामुळे उरणची आरोग्यसेवाच कोलमडली असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

उरण परिसरात जेएनपीए, ओएनजीसी, बीपीसीएल, रासायनिक प्रकल्प आणि त्यावर आधारित शेकडो कंटेनर यार्ड कार्यरत आहेत. जेएनपीए बंदरातुनच ८० लाख कंटेनर मालाची आयात निर्यात होते. प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या मालवाहतूकीमुळे देशाला व्यापारातून दरवर्षी सुमारे ७५-८० हजार कोटी महसूल मिळवून देणाऱ्या उरणला उरणकरांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी शासनाला १५ वर्षांतही

- **तीन डॉक्टरांवर शेकडो रुग्णांचा भार**
- **सीआरझेडमुळे जागेचाही तिढा कायम**

१०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारता आलेले नाही.

परिसरात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि वाहतूकीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. मात्र त्यामानाने उरणमधील असलेली उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र रुग्णांसाठी अपुरे पडतात. आरोग्यसेवेवरील ताण कमी करण्यासाठी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.यासाठी सिडकोने रुग्णालयासाठी बोकडवीरा गाव हद्दीत ५९०० चौमी भुखंड दिला आहे. या भुखंडावर नियोजित रुग्णालय उभारण्याची तयारी सुरू केली होती.शासनाने यासाठी १५ वर्षांपूर्वी ५२ कोटी रुपये निधीही मंजूर केला होता. मात्र सिडकोने दिलेल्या भुखंडावरील ९८० चौरस मीटर जागेवर खारफुटीची झाडे उगवल्याने १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सीआरझेडच्या कचाट्यात सापडले आहे. सीआरझेडचा प्रश्न निकाली काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाठपुरावा करूनही तीढा सुटलेला नाही. यामुळे कामाला विलंब होत चालला आहे. मात्र १५ वर्षात कामाला सातत्याने झालेल्या विलंबामुळे या कामाचा खर्च ५८ कोटी खर्चाचे काम ८२.५४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असल्याची माहिती उरण सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली.

> इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचा भार सध्या तीन डॉक्टरांवरच आहे. बाह्यरुग्णांची संख्या वाढत चालली आहे. मात्र, मागील २५ वर्षांपासून डॉक्टरांच्या संख्येत वाढ झालेली नाही. डॉक्टरांची पदे वाढविण्याची आवश्यकता आहे. रुग्णवाहिकेसाठी एका वाहनचालकाचे पद रिक्त आहेत, त्यामुळे काही वेळा रुग्ण वाहतूकीची समस्या निर्माण होते.
> -बाळासो कालेल
> इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक

मागील १५ वर्षांपासून उरणमध्ये १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याचे स्वप्न साकार झालेले नाही.याला बऱ्याच अंशी येथील लोकप्रतिनिधीच जास्त जबाबदार असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. मात्र उपजिल्हा रुग्णालयाचे काम रखडल्याने रुग्णसेवेचा ताण उरणमधील असलेल्या उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर पडत आहे. त्यातच इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक समस्या आहेत. भेडसावणाऱ्या अनेक उणीवांमुळे रुग्णांना उपचारासाठी नवीमुंबई, पनवेल, मुंबईची वाट धरावी लागत आहे.

# कर्जतमध्ये आदिवासी भागात पाणीटंचाई

## टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्याच्या आदिवासी भागात पाणी टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे आदिवासी भागातील लोकांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे आदिवासी समाज संघटनेची वतीने पाणीटंचाई स्थिती उद्भवलेल्या वाड्याना टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी केली आहे. आदिवासी समाज संघटनेचे वतीने कर्जत तहसीलदार आणि कर्जत पंचायत समितीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुका आदिवासी बहुल तालुका असून या तालुक्यात एप्रिल महिना सुरू झाल्यानंतर पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होते. आदिवासी भागातील पिण्याच्या पाण्याची सोय भावी यासाठी नळपाणी योजना राबविल्या आहेत.मात्र अनेक नळपाणी योजन बंद स्थितीत आहेत तर नवीन पाणी पुरवठा योजनेची कामे अपूर्ण स्थितीत आहेत.त्यामुळे अशा आदिवासी वाडी वस्तीवर पिण्याच्या पाण्याचे अडचणी निर्माण झाल्या आहेत. मोग्रज विभाग रेल्वे पट्टा, नेरळ विभाग, कशेळे विभाग, कळंब विभाग आदी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याचे आदिवासी विमाने नमूद केले आहे.

आदिवासी संघटनेने तालुक्यातील नळ पाणी योजनेची अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करावी. बंद स्थितीत असलेल्या नळपाणी योजना सुरळीत कराव्यात तसेच पाणी टंचाई भागात तातडीने टँकरने पाणी पुरवठा सुरु करावा. बंद असलेल्या आणि अपूर्ण असलेल्या नळपाणी योजना यांची कामे जलदगतीने पूर्ण व्हावीत अशी आदिवासी संघटनेने मागणी केली आहे. टँकर पाणी पुरवठा करावा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल तसेच कर्जत पंचायत समिती आणि तहसील कार्यालयावर हंडा मोर्चा काढला जाईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, अक्षय तिटकारे, जयवंती हिंदोळा, भगवान भगत, मनोहर ढुमणे, मोहन वारघडा, बबन शेंडे, काशिनाथ पादीर, लक्ष्मण उघडे, काशिनाथ उघडे, हिरू निरगुडा, ऋषी पुंजारा, परशुराम थोराड आदी उपस्थित होते.

# आजाद कामगार संघटनेतर्फे आंदोलनाचा इशारा

**| पनवेल | प्रतिनिधी|**

आजाद कामगार संघटना यांच्या वतीने पनवेल महानगरपालिकेतील सफाई कामगारांवर होत असलेल्या कथित जबरदस्तीच्या कामाविरोधात तीव्र आक्षेप नोंदवण्यात आला आहे. याबाबत संघटनेने महापालिकेच्या आरोग्य विभागाला लेखी निवेदन दिले आहे.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना फुटपाथ गटारांमध्ये उतरून गाळ काढण्याचे काम करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे काम कामगारांच्या कार्यक्षेत्रात येत नसतानाही त्यांच्यावर सक्ती केली जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कामगारांची इच्छा नसतानाही त्यांना जबरदस्तीने अशा धोकादायक कामात ढकलले जात असून, यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून वरिष्ठांचे आदेश



आहेत असे सांगून कामगारांवर दबाव टाकला जात असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

या प्रकाराला बेकायदेशीर आणि अमानवीय असे संबोधत संघटनेने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देऊन अशा प्रकारची जबरदस्ती थांबवावी, अन्यथा संघटना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# अंबर्लेत भाविकांची गर्दी

**माणगाव** : सोनभैरी, जोगेश्वरी, सोमजाई, बापुजी आणि हनुमान जयंती उत्सवानिमित्त माणगाव तालुक्यातील अंबर्ले येथे पारंपरिक जत्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पालखी सोहळ्याचे प्रस्थान अंबर्ले गावचे सामाजिक कार्यकर्ते सिताराम उभारे यांच्या निवास स्थानातून करण्यात आले होते. मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते पालखीचे विधिवत प्रस्थान झाले. त्यावेळी अंबर्ले गावातील नागरिक, भाविक त्याचबरोबर परिसरातील तीनही गावांतील भाविक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहुन सहभागी झाले होते. रात्री उशिरापर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'सारेगमपा कोल्हापूर' या ऑर्केस्ट्राच्या सादरी करणाने उपस्थित प्रेक्षक, श्रोत्यांची मने जिंकली. पहाटे तीन वाजल्यापासून भजन मंडळांनी अखंड भजन सेवा सादर केली.

# मुक्या प्राण्यांसाठी खाद्याची व्यवस्था

**| उरण | प्रतिनिधी |**

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या वतीने जागतिक जल दिवसाचे औचित्य साधून मूठभर धान्य व घोटभर पाणी ही संकल्पना राबविण्यात आली. सध्या उन्हाचे दिवस आहेत, पक्षांना व मुक्या प्राण्यांना सध्या पाणी व खाऊची गरज आहे याचे भान ठेऊन शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने मूठभर धान्य व घोटभर पाणी ही संकल्पना करंजाडेमध्ये राबविण्यात आली. या कार्यक्रमाला शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील, राकेश कुसळे, सुनील अंबावडे, अविनाश ठोसर, सुरेश बारवे, अमर कुसळे, तुषार कदम, योगेश कुलाल, अमर सावंत, रोशन शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिव प्रतिष्ठानच्या वतीने निसर्ग व पर्यावरणचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सर्वांनी पक्षांसाठी व पाळीव प्राण्यांसाठी असा संकल्पना



राबविल्या पाहिजेत, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. निसर्ग व सजीव सृष्टी टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजेत असा संदेश प्रत्यक्ष कृतीतून सदर संस्थेने सर्वांना दिला आहे.

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या मूठभर धान्य व घोटभर पाणी या उपक्रमामुळे मुक्या प्राण्यांना पाणी व अन्न, खाद्य उपलब्ध होणार आहे त्यामुळे उन्हाळामध्ये मुक्या पशु पक्षी प्राण्यांचे मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे. सदरच्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# भटक्या कुत्र्यांमुळे घबराट

**पनवेल** : खांदा वसाहत परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः सेक्टर ८ आणि सेक्टर १३ भागात लहान पिल्लांसह कुत्र्यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. या परिसरातील शाळांच्या आवारातही भटके कुत्रे मुक्तपणे फिरत असल्याने शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये घबराट निर्माण होत आहे. पालकांनीही याबाबत चिंता व्यक्त केली आहे. पनवेल महानगरपालिकेकडून भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी लसीकरण व निर्बीजीकरण केले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात या उपाययोजनांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

# आसूड गावाजवळ पाण्याची गळती

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील आसूड गावाजवळ मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लगतून जाणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाणी पुरवठा पाइपलाईनमधून दररोज लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. या गळतीमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांना तसेच नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

पनवेल महानगरपालिकाच्या महासभेत सत्ताधारी व विरोधकांनी पाणी प्रश्नावर प्रशासनाला धारेवर धरले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या या गळतीकडे अद्याप कोणतेही



- **लाखो लिटर पाणी वाया**

ठोस लक्ष दिले गेले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. फुटपाथच्या बाजूने गेलेल्या या पाइपलाईनमुळे वारंवार नुकसान होऊन पाणी वाया जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

उन्हाळ्याच्या तोंडावर सर्वत्र पाण्याची टंचाई भासत असताना अशा प्रकारे लाखो लिटर पाणी वाया जाणे चिंतेची बाब ठरत आहे. भविष्यात अशा गळतीच्या घटना टाळता येतील, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असताना याला जबाबदार कोण, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

# नेरळ स्थानकातील सरकता जिना कार्यान्वित

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मध्य रेल्वे वरील नेरळ जंक्शन रेल्वे स्थानक येथे प्रवाशांचे सोयी साठी बनविण्यात आलेला सरकता जिना सोमवारी (दि.६) एप्रिल रोजी कार्यान्वित करण्यात आला. स्थानकातील हा दुसरा सरकता जिना असून फलाट एकवर आणखी एक सरकता जिना असून तो यापूर्वी कार्यान्वित झालेला आहे. खा. श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून मध्य रेल्वेवरील नेरळ स्थानकाचे मेकओव्हर करण्याचे काम सुरू आहे. नेरळ स्थानकात पादचारी पूल, सरकता जिना, उद्वाहन तसेच प्रवासी निवारा शेड, स्वच्छता गृह, खानपान सेवा अशा सुविधा उपलब्ध करण्याचा रेल्वेचा प्रयत्न



आहे. माथेरान थंड हवेचे ठिकाणी जाण्यासाठी नेरळ येथून माथेरान जाणारी मिनीट्रेन जात असते. मुंबई ठाणे भागातून येणारे पर्यटक फलाट एक वर उतरतात आणि त्यानंतर माथेरान तसेच नेरळचे विविध भागात जात असतात. ही बाब लक्षात घेऊन फलाट एक वर स्काय वॉक बनविण्यात आला असून मुंबईच्या दिशेकडे सरकता जिना कार्यान्वित झाला आहे. उपनगरीय लोकल स्थानकात पोहचल्यानंतर त्यावेळी माथेरान जाणारे आणि अन्य प्रवासी यांची गर्दी होत असते. अशावेळी सरकता जिना प्रवाशांना मदतगार ठरत आहे.

स्थानकाच्या मध्यभागी आणखी एक सरकता जिना बनविण्यात आला आहे आणि हा सरकता जिना अनेक महिन्याचे प्रतीक्षेनंतर अखेर स्थानक प्रबंधक गुरुनाथ पाटील यांनी प्रथम प्रवास करीत हा सरकता जिना कार्यान्वित करण्यात आला.

श्रीवर्धन प्रशासनाचा अंगावर येणारा 'कचरा' कंत्राटदाराची मुजोरी की प्रशासनाचे वरदहस्त?

# कंत्राटी सफाई कामगारांचे 'कामबंद' आंदोलन

**| संदेश घोलप |**

**| श्रीवर्धन |**

ऐतिहासिक आणि पर्यटन नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन शहराच्या स्वच्छतेचा कणा असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. स्वच्छ सर्वेक्षणात मिरवणाऱ्या श्रीवर्धन नगरपरिषदेचा खरा 'मळभ' आता चव्हाट्यावर आला आहे. ज्या हातांनी शहर चकाचक ठेवले, त्याच हातांना हक्काच्या घासापासून वंचित ठेवणाऱ्या निर्दयी प्रशासनाविरुद्ध कंत्राटी सफाई कामगारांनी आता एल्गार पुकारला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेले आर्थिक शोषण आणि प्रशासनाची मुजोरी यामुळे संतप्त झालेल्या कामगारांनी आजपासून 'अनिश्चितकालीन कामबंद' आंदोलनाचे अस्त्र उपसले आहे. प्रशासकीय अनास्था आणि कंत्राटदाराच्या अघोरी नफेखोरीमुळे शेकडो कामगारांचे भविष्य टांगणीला लागले असून, या अन्यायाविरोधात आता राजकीय वातावरणही तापू लागले आहे. कामगारांच्या घामाचा पैसा चोरणाऱ्यांना श्रीवर्धनच्या रस्त्यावरून फिरू देणार नाही, असा संतप्त इशारा देवेंद्र भुसाणे यांनी दिला आहे.



नगरपरिषदेच्या कागदोपत्री सफाई कामगारांसाठी प्रतिदिवशी ६२७ रुपये मजुरी मंजूर असताना, प्रत्यक्षात त्यांच्या पदरात केवळ ३३३ रुपये पाडले जात आहेत. दिवसाढवळ्या होणारी ही लूट म्हणजे निव्वळ भ्रष्टाचार नसून कामगारांच्या हक्कावर टाकलेला दरोडा आहे.

कामगारांनी पुकारलेल्या या 'बेमुदत कामबंद' आंदोलनामुळे शहरात कचऱ्याचे ढीग साचण्यास सुरुवात झाली आहे. एकीकडे आरोग्य धोक्यात आले असताना दुसरीकडे प्रशासन कंत्राटदाराला पाठीशी घालण्यात मग्न असल्याचा आरोप होत आहे. लेखी आश्वासन आणि पूर्ण थकीत पगार मिळाल्याशिवाय एकही कामगार हातात झाडू घेणार नाही, या भूमिकेवर सर्व कामगार ठाम आहेत. आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. जर हे आंदोलन चिघळले, तर श्रीवर्धनच्या इतिहासातील हे सर्वात मोठे लोकआंदोलन ठरेल, यात शंका नाही.

> श्रीवर्धनला स्वच्छ ठेवणाऱ्या हातांनाच आज भीक मागण्याची वेळ प्रशासनाने आणली आहे. कंत्राटदाराची एवढी हिंमत होतेच कशी की तो सरकारी नियमा धाब्यावर बसवून कामगारांचे निम्मे पैसे हडप करतो? पगार नाही, सुरक्षा साधने नाहीत, पीएफचा पत्ता नाही. येत्या ४८ तासांत कामगारांचा थकीत पगार आणि मजुरीतील तफावत दूर झाली नाही, तर आम्ही नगरपरिषदेच्या उंबरठ्यावर उग्र आंदोलन करू.
> – देवेंद्र भुसाण

# उन्हाळयामध्ये अग्निशमन यंत्रणेची आवश्यकता

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यात उन्हाळयाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वणवे लागण्यासोबतच शॉर्टसर्किट आणि अचानक पेट घेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलादपूर तालुक्यात उन्हाळयामध्ये अग्निशमन यंत्रणेची आवश्यकता भासू लागली आहे. पोलादपूर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्यानंतर सुसज्ज अग्निशमन यंत्रणा कार्यरत होण्याच्या अपेक्षेचा भंग झाल्याने महाड एमआयडीसी, महाड व खेड नगरपालिकेच्या अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी दाखल होईपर्यंत आगीमुळे भस्मसात होण्याचे प्रकार घडत असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील धामणदेवी येथे मोर उडताना मोराचा पाय विद्युत वाहक तारेला लागल्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन सुनील माने यांच्या वाडयाला आग लागण्याची घटना घडली होती. त्यात माने यांच्या वाडयाला आग लागल्याने ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर पाणी मारत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, जवळ गुरांचा पेंढयामुळे आगीने उग्र धारण केले. वाडयाबरोबरच माने यांच्या गिरणीचा दरवाजाही आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला. ग्रामस्थांनी तात्काळ महाड नगरपरिषद व महाड एमआयडीसीच्या अग्निशमन यंत्रणेला पाचारण केले. दरम्यान महाड नगरपरिषदेची फायर ब्रिगेड घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पेंढा जळून खाक झाला. मात्र, आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

दुसऱ्या घटनेमध्ये लोहारे ग्रामपंचायत हद्दीत सोमवारी दुपारी प्रखर उन्हात लागलेल्या वणव्यामुळे महावितरण कंपनीच्या केबलसह यंत्रप्रणालीचे नुकसान झाले. सद्यस्थितीत पोलादपूर तालुक्यात वणवा लागण्याचे प्रमाण अधिक असून सर्वत्र डोंगर भागात वणवे लागल्याने त्याचा फटका आंबा बागायतदारांसह छोटे मोठया फळबागायतदारांनी बसत आहे. देऊळकोंड येथे वणवा आल्याने विजेचा खांब आगीच्या ज्वाळांनी वेढला गेला.

तालुक्यात कोठेही आगीची घटना उदभवल्यास पोलादपूर नगरपंचायतीकडे कोणतीही अग्निशमन यंत्रणा अथवा सुविधा नसल्याने महाड व खेड नगरपालिकेच्या अग्निशमन यंत्रणेसह महाड औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन विभागाला पाचारण केले जाते.

मात्र, संबंधित अग्निशमन यंत्रणा व जवान घटनास्थळी दाखल होईपर्यंत जनावरे, गुरांचा चारा, गुरांचे वाडे, घरे तसेच आंब्याच्या बागा व अन्यप्रकारचे अतोनात नुकसान होत आहे. परिणामी, तालुक्यात किमान उन्हाळयामध्ये अग्निशमन यंत्रणा तैनात ठेवण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## सुधागडमध्ये घरपोच गॅस सेवा सुरू

**पाली / वाघोशी :** ग्रामीण भागात घरपोच गॅस वितरणाचा निर्णय सुधागड तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना घरगुती गॅस सिलेंडर मिळवताना होणाऱ्या त्रासाची दखल घेत, उद्यापासून गावोगावी ग्राहकांपर्यंत सिलेंडर पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) तर्फे भारत गॅस एजन्सी तसेच सुधागड तालुक्याचे तहसीलदार उत्तम कुंभार यांची भेट घेऊन नागरिकांच्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील महिला, वयोवृद्ध नागरिकांना स्वतःच्या खर्चाने पाली येथे येऊन सिलेंडर घ्यावा लागत होता. यासाठी दोन ते तीन तास उन्हात थांबावे लागत असून, वाहनभाड्यासाठी दीड ते दोन हजार रुपये खर्च करावे लागत होते. या पार्श्वभूमीवर मनसेने गॅस एजन्सींना गावोगावी जाऊन ग्राहकांना थेट सिलेंडर वितरित करण्याचे निर्देश दिले. ज्या ग्राहकांचे गॅस बुकिंग झाले आहे त्यांना प्राधान्याने सिलेंडर देण्यात येणार असून, ज्यांना बुकिंग करता येत नाही अशा नागरिकांना स्थानिक पातळीवर मदत करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि त्रास मोठ्या प्रमाणात वाचणार असून, ग्रामीण भागातील महिलांना दिलासा मिळणार आहे. तसेच कोणतीही अडचण आल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना नागरिकांच्या सेवेत तत्पर राहील, असेही यावेळी सांगण्यात आले. या बैठकीस मनसेचे सुधागड तालुका उपाध्यक्ष केवल चव्हाण, परेश वनगले, मुकेश चव्हाण, योगेश चव्हाण, हिरामण पाटेकर, निलेश गोरीवले, नरेंद्र घोगले आदी उपस्थित होते.


### जाहीर सूचना

याची नोंद घ्यावी की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही **अमृता मुरली मोटियानी आणि रितिका परेश मोटियानी** यांचे, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, नंदईपाडा गावात स्थित, गट क्र. ४१/१ येथील २२०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या बिगरशेती जमीन, वडिलोपार्जित मालमत्ता आणि जमिनीच्या संदर्भातील हक्क, मालकी आणि हितसंबंधांची चौकशी करत आहोत, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील अनुसूचीमध्ये दिलेले आहे (यात यानंतर '**सदर जमीन**' असा उल्लेख करण्यात आलेला आहे) संबंधातील हक्क विलेखांची चौकशी करीत आहोत.

सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बक्षीस, न्यास, एकाधिकार, वारसा, भोगवटा, कब्जा, भाडेदारी, पोट-भाडेदारी, संमती नि परवानगी, अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्वावरील, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, परीरक्षा, सुविधाधिकार, प्रसंविदा, अधित्याग, अधित्यजन, अनुदान किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने कोणताही करार, विलेख, दस्तऐवज, लिखिते, अभिहस्तांतरण विलेख, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था,/ तडजोड, सामंजस्य ज्ञापन, विवाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा न्यायालयीन आदेश, करार/ करारनामे किंवा भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना अशा दाव्याच्या या सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत पाठींबा देणाऱ्या सर्व नोटरी केलेल्या दस्तऐवजासह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळवावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. अन्यथा अशा व्यक्तींचा दावा, मागणी, अधिकार, हक्क, हितसंबंध, विवाद किंवा आक्षेप, जर काही असेल तर त्यांचा अधित्याग/परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**परिशिष्ट :**
**(सदर जमिनीचे वर्णन)**

गाव नंदाईपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित, आणि नोंदणी जिल्हा रायगड व नोंदणी उप-जिल्हा अलिबागमध्ये, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग यांच्या स्थानिक हद्दीत असलेली, गट क्र. ४१, हिस्सा क्र. १ असलेली, २२०० चौ. मी. क्षेत्रफळाची, मूल्यांकन रु. २२० असलेली, बिगरशेती जमीन, वडिलोपार्जित मालमत्ता किंवा भूखंड, ज्याच्या सीमा खालील प्रमाणे आहेत:

सीमा खालीलप्रमाणे:
उत्तर: नंदाईपाडा गावचा गेट क्र. ५२
पश्चिम: गावचा रस्ता
पूर्व: नंदाईपाडा गावचा गेट क्र. ५१
दक्षिण: नंदाईपाडा गावचा गेट क्र. ४१/२

**आज दिनांक ८ एप्रिल, २०२६**

**नेहा सेहेगल**
**भागिदार,**
**युनिव्हर्सल लिगल**
१६१/१६२, ए विंग, मित्तल कोर्ट,
जमनालाल बजाज मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई-४०००२१



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) जानू बाबू पाटील<br>२) पांडूरंग बाबू पाटील | ९४ | १ | ०-५८-४०<br>पैकी ०-२८-०० | १२.८१ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ०८/०४/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यू को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो. : ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक विश्वनाथ रामचंद्र घारे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविल्या आहेत सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे सांगवी, ता . कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं . | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १२/ब | ०-०४-५० | ०-२२ |
| ८ | १/अ | ०-२९-०० | ४-४१ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथव रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे म्हात्रोळी, ता.अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| म्हात्रोळी | ३१३/१ | ०-२४-८०<br>पो.ख.०-०९-६०<br>०-३४-४० | रु.७.५६ | १)श्रीम.सुजाता शांताराम नाईक.<br>२) श्री. राजेंद्र शांताराम नाईक,<br>३) सौ. सुजाता प्रताप म्हात्रे.<br>४) सौ. प्रज्ञा प्रकाश म्हात्रे. |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. ०८/०४/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे नेवाळी तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक गोपिनाथ सदाशिव जंगम वगैरे ३ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे नेवाळी तर्फे वासरे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १९ | ३ | ०-१७-२० | २-७५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०४/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
फ्लॅट नं ३०१,राजलक्ष्मी अपार्टमेंट, अभिनव ज्ञान मंदिरजवळ, कर्जत, कर्जत, रायगड



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रामदास मधुकर म्हसे | १७२ | ४ | ०-२१-७० | २ | ९४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-०७/०४/२०२६



### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my Clients have entered into an negotiations with the owner being Mr. Tukaram Sakharam Bailmare ("Owner") of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and further is proposing to purchase said Property from them, as mentioned in First Schedule hereunder written and therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All persons/entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and / or demand and/ or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owner in / to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlement or under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the agricultural land admeasuring 33 Ares 85 Square Metres, approximately admeasuring 3,385 Square Metres. Assessing to Rs.0.22 Paise, being part and parcel of land bearing Bhumapan Kramank/Upavibhag/ Survey No. 10 Hissa 1/A admeasuring in aggregate 67 Ares 70Square Metres, approximately admeasuring 6,770 Square Metres Assessed to Rs.0.45 Paise, being, lying and situated at Village Savroli, Taluka Khalapur and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibaug. Taluka Alibaug. District Raigad, 402 201.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळिवण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत (सदर मिळकत) मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून ती निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा देवून, सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायम खूषखरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत आमची कागदपत्रांनिशी खात्री करुन द्यावी अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा नाही व असल्यास, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मे. दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे स्थळसीमेंतील तसेच जिल्हा परिषद अलिबाग - रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग, ग्रुप ग्रामपंचायत धोकवडे हद्दीतील गाव मौजे धोकवडे येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६४८ यांसी क्षेत्र ०-१२-९० हे. आर, पो.ख. ०-००-२० हे. आर, एकूण क्षेत्र ०-१३-१० हे. आर यांसी आकार ३-५६ रु. पैसे यांसी चतुः सिमा पूर्वेस वा त्याबाजूस : गट नं. ६४९, पश्चिमेस वा त्याबाजूस गट नंबर ६४७, दक्षिणेस वा त्याबाजूस : गट नं. ६७९ व ६५०, उत्तरेस वा त्याबाजूस गट नंबर ६४७, येणेप्रमाणे मिळकत, त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, तृण, काष्ठ, पाषाण, निधीनिक्षेप वगैरे सर्व तदूंगभूत वस्तूंसहीत व जाण्यायेण्याच्या रस्त्याच्या वहिवाटीच्या तसेच सर्व तद्नुषंगिक व संलग्नित हक्कांसह दरोबस्त, काही एक राखून न ठेवता.

अलिबाग,
दि. ०७.०४.२०२६

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक कार्यालय, अलिबागच्या समोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मोतिराम तुकाराम हुले व ९, रा. पोटलज खुर्द, ता. सुधागड जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- नांदगाव, ता.सुधागड, जि.रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| ३७ | ५-००-५० | ५.५६ |
| | पैकी ३-४०-०० हे. आर. | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०८/०४/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयाणापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-कोल्हीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) अमरेंद्र शिवजी सिंह<br>२) सुनील दामू भोईर<br>३) शिवाजी भाऊ भोईर | १५ | ८/अ | ०-३७-४० | ५ | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ
नेरळ पुर्व, ता. कर्जत, जि. रायगड
४१०१०१

सही/-
**ॲड.नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :-०८/०४/२०२६
मो.नं. ९३७२९६४६६५



दिनांक ०७/०४/२०२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मढाळी ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - मढाळी ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स. नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.महादेव रघुनाथ साजेकर | १५/२ | ०-२२-५० | २-१९ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १५ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक ०७/०४/२०२६

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८



### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१)लवाद दावा क्रमांक ९७/२०२५ मधील दिनांक ०७/०२/२०२५ रोजीचा वसुली दाखला
२)महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)
३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/१५६/२१६/२०२५ दि. ०१/०७/२५

जा.क्र./एस.आर.ओ/१०३/सन २०२६
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग, कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि.रायगड फोन नं. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०७/०४/२०२६

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी डॉ.डंगर ग्रा.बि.सहकारी पतसंस्था म.दादर ता.पेण जि.रायगड यांनी लवाद वसुलीदाखला क्रमांक ९७/२०२५ मधील दिनांक ०७/०२/२०२५ रोजीच्या वसुलीदाखल्यात नमुद केलेप्रमाणे श्री.किसन नारायण मांगरुळकर यांनी डॉ.डंगर ग्रा.बि.सहकारी पतसंस्था म.दादर ता.पेण जि.रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये १,९९,२९०/- प्लस व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे श्री.किसन नारायण मांगरुळकर यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७(१०)व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाचा क्र.व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| ९७/२५<br>०७/०२/२५ | १.श्री. किसन नारायण मांगरुळकर मु.पो.हमरापुर ता.पेण, जि.रायगड<br>२.श्री.रामनाथ मोरेश्वर ठाकूर मु.पो.हमरापूर ता.पेण,जि.रायगड<br>३.श्री.राजु गोविंद मोकल मु.पो.हमरापुर पेण ता.पेण जि.रायगड | श्री. किसन नारायण मांगरुळकर यांचे मौजे हमरापुर, ता.पेण, जि.रायगड येथिल ग्रामपंचायत हमरापुर हद्दीतील मालमत्ता क्र. १०८/ब मालमत्तेचे वर्णन वि.सी. लोखंडी सि.पत्रे पक्के घर क्षेत्र २३०चौ.फुट.हि मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

(शिक्का)

सही/-
**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड-अलिबाग**



### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१)लवाद दावा क्रमांक २६५/२०१६ मधील दिनांक २३/०३/२०१६ रोजीचा वसुली दाखला
२)महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११)
३) वसुली व विक्री अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/१५६/११०/२०२५ दि. ०६/०६/२५

जा.क्र./एस्.आर्.ओ/१०४/सन २०२६
वसुली अधिकारी, यांचे कार्यालय,
रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्या.
अलिबाग,कृष्णमंदिर सोसा, मारुती नाका अलिबाग
जि.रायगड फोन नं. ९१५६७६६०७७
दिनांक :- ०७/०४/२०२६

**जप्तीची नोटीस**

ज्याअर्थी डॉ.डंगर ग्रा.बि.सहकारी पतसंस्था म.दादर ता.पेण जि.रायगड यांनी लवाद वसुलीदाखला क्रमांक २६५/२०१६ मधील दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या वसुलीदाखल्यात नमुद केलेप्रमाणे श्री.मारुती गोमा पाटील यांनी डॉ.डंगर ग्रा.बि.सहकारी पतसंस्था म.दादर ता.पेण जि.रायगड या पतसंस्थेतून कर्ज घेतले असून, सदरचे कर्ज थकीत झाल्यामुळे व दावा रक्कम रुपये ४०,३०२/- प्लस व्याज व इतर खर्च न भरल्यामुळे श्री.मारुती गोमा पाटील यांची खालील वर्णनाची मालमत्ता आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७(१०)व (११) अन्वये जप्त करण्यात आली आहे. या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाडयाची किंवा आदेशाचा क्र.व दिनांक | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुद्ध दिला आहे त्यांची नावे व पत्ते | मालमत्तेचे वर्णन व पत्ता | शेरा इतर बोजे |
|---|---|---|---|
| २६५/१६<br>२३/०३/१६ | १.श्री. मारुती गोमा पाटील मु.पो.रावे ता.पेण, जि.रायगड<br>२.श्री. संजय यशवंत पवार मु.पो.दादर ता.पेण, जि.रायगड<br>३.श्री.दिलीप हरीभाऊ पवार मु.पो. तरे आळी पेण ता.पेण जि.रायगड | श्री.मारुती गोमा पाटील यांचे मौजे रावे, ता.पेण, जि.रायगड येथिल ग्रामपंचायत रावे हद्दीतील मालमत्ता क्र.१७५ अ मालमत्तेचे वर्णन विट सिमेंट रेती कौलारु क्षेत्र ९१४ चौ.फुट. हि मिळकत | |

येणे रक्कम, त्यावरील होणारे व्याज व कायदेशीर खर्च जप्ती आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

(शिक्का)

सही /-
**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड-अलिबाग**



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# पंजाबसाठी पाऊस ठरला व्हिलन

## सामना रद्द झाल्यामुळे नुकसान; तर केकेआरचा मात्र फायदा



। कोलकाता । वृत्तसंस्था ।

कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील आयपीएल २०२६ चा सामना पावसामुळे रद्द झाला. केकेआरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने ३.४ षटकांत दोन गडी गमावून २५ धावा केल्या होत्या. त्याचवेळी, हलक्या पावसामुळे सामना थांबला. मात्र, पावसाचा जोर झपाट्याने वाढल्याने सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही.

पाच षटकांच्या सामन्यासाठी कटऑफची वेळ रात्री ११:१४ होती. पाऊस थांबला, पण जेव्हा मैदानावरील आच्छादन काढण्यात आले, तेव्हा मैदान खूप ओले होते आणि सीमारेषेजवळ पाणी साचले होते. निर्धारित वेळेत मैदान तयार करता आले नाही, त्यामुळे पंचांनी मैदानाची पाहणी करून दोन्ही कर्णधारांशी चर्चा केली आणि सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. केकेआर आणि पंजाब यांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.

कोलकातामध्ये पावसाची शक्यता लक्षात घेता, नाणेफेक जिंकल्यानंतर अजिंक्य रहाणेने प्रथम फलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय आश्चर्यकारक होता. प्रमुख खेळाडूंनीही या निर्णयावर टीका केली. झेवियर बार्टलेटने एकाच षटकात फिन ॲलन आणि कॅमेरॉन ग्रीन यांना बाद केल्याने केकेआरच्या अडचणी आणखी वाढल्या.

कोलकाता आणि पंजाब यांच्यातील ५ षटकांच्या सामन्यासाठी कट-ऑफची वेळ रात्री ११:१४ वाजता निश्चित करण्यात आली होती. जर सामना पाच षटकांपर्यंत खेळला गेला असता, तर कोलकाताला फलंदाजीसाठी फक्त आठ चेंडू अधिक मिळाले असते. केकेआर ३.४ षटकांत केवळ २५ धावाच करू शकला. खूप प्रयत्नांनंतरही कोलकाताला जास्तीत जास्त ५० धावांपर्यंतच पोहोचता आले. स्पष्टपणे, जर सामना पुन्हा सुरू झाला असता तर पंजाबला मोठा फायदा झाला असता.

दोन्ही संघांना एक-एक गुण सामना रद्द झाल्यानंतर, कोलकाता नाईट रायडर्सने गुणतालिकेत आपल्या गुणांची सुरुवात केली. या एका गुणासह, केकेआर आठव्या स्थानावर पोहोचला आहे. दरम्यान, पंजाब किंग्सने एका गुणासह आता पाच गुण मिळवले असून ते गुणतालिकेत अव्वल स्थानी आहेत. दुसरीकडे, पंजाब किंग्स या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित आहे. तर दुसरीकडे, कोलकाताला अजून एकही सामना जिंकता आलेला नाही.

उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या आणि विजयाचे प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या पंजाब किंग्सला पावसामुळे मोठा धक्का बसला. त्यांना केवळ एका गुणावर समाधान मानावे लागले. दुसरीकडे, सलग दोन सामने गमावलेल्या केकेआरसाठी हा सामना जिंकण्याची एक संधी होती, परंतु पावसामुळे सामना रद्द करण्यात आला. त्यांचा सध्याचा फॉर्म पाहता, असे मानले जाते की पावसामुळे केकेआर संभाव्य पराभवापासून वाचले. या सामन्यामुळे केकेआरला या हंगामातील पहिला गुण मिळाला. पंजाब किंग्सने आता तीन सामन्यांमधून एकूण तीन गुण मिळवले आहेत, ज्यात दोन विजय आणि एक रद्द झालेला सामना यांचा समावेश आहे.

## निवडक

### सुभाष पाटील तायक्वांदो परीक्षक



**चिरनेर :** तायक्वॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ उत्तराखंड या अधिकृत संघटने मार्फत देहरादून येथे १० ते १२ एप्रिल २०२६ राष्ट्रीय पंच सेमिनार व राष्ट्रीय पंच परीक्षा होणार आहे या होणाऱ्या तायक्वांदो परीक्षेसाठी परीक्षक म्हणुन रायगडचे सुपूत्र तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे. सुभाष पाटील हे ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पंच म्हणुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत आंतरराष्ट्रीय ज्युनियर तायक्वांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २००४ भारतीय संघाचे कोच, पंच पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा २०१० भारत, पंच कॉमनवेल्थ स्पर्धा २०११ आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २०११ भारतीय संघाचे कोच, पंच ११ वी इजराइल ओपन तायक्वांदो स्पर्धा २०१३ पंच ८ वी स्कॉटिश ओपन स्पर्धा २०१३ स्कॉटलंड, संघप्रमख कोरिया ओपन २०१४, आरतराष्ट्रीय साफ गेम २०१६, लुसोफोतीया तायक्वांदो स्पर्धा नियंत्रक २०१४ गोवा, कॅनडा ओपन व पैरा ओपन तायक्वांदो चॅम्पियनशिप २०१७ पंच २०२३ वर्ल्ड तायक्वांदो प्रेसिडंट कप व ओशियाना पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा तसेच आतापर्यंत अनेक स्पर्धा परिक्षांमध्ये सहभागी होऊन सुभाष पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. गोवा नॅशनल गेम २०२३ व नॅशनल गेम उत्तराखंड २०२५ स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची पंच प्रमुख म्हणून निवड करण्यात आली होती ते ९ एप्रिल २०२६ रोजी देहरादून उत्तराखंड येथे रवाना होणार आहेत.

### केआरपी इलेव्हन विजेते



**मुंबई :** समर व्हेकेशन क्रिकेट शिल्ड टूर्नामेंटचे विजेतपद केआरपी क्रिकेट क्लब यांनी पटकावले. केआरपी क्रिकेट क्लबने गौड युनियन क्रिकेट क्लबचा सहा विकेटने पराभव करून हे विजेतपद पटकावले. अंतिम सामन्यांमध्ये मनीष रावने सर्वोत्तम क्रिकेटपटूचा, तसेच उत्कृष्ट गोलंदाजाचा पुरस्कार पटकावला. योगेश पवार यांनी उत्कृष्ट फलंदाजाचा पुरस्कार पटकावला. स्पर्धेचा बक्षीस समारंभ अजिंक्य नाईक, उन्मेश खानविलकर, सी एस नाईक आणि माजी उपाध्यक्ष संजय नाईक आणि आजी-माजी कार्यकारिणी सदस्य व क्लब सचिव यांच्या उपस्थितीत पार पडला. गौड युनियन क्लबने नाणेफेक जिंकून स्वतः फलंदाजी केली. त्यांचे सर्वबाद १३९ धावसंख्या झाली योगेश पवार यांनी ६५ धावा केल्या केआरपीचे कर्णधार मनीष राव यांनी २५ धावा देऊन चार फलंदाज बाद केले. १३९ धावसंख्येचा पाठलाग करताना केआरपी क्रिकेट क्लब यांनी चार फलंदाज गमावून सहा विकेटने विजेतपद पटकावले. समरीध भट्ट नाबाद ६२ आणि मनीष राव यांनी नाबाद २९ धावा केल्या.

### सरफराजचा आयपीएलमध्ये विक्रम

**मुंबई :** आयपीएल स्पर्धेत विक्रम रचणं आणि मोडणं आता काही नवीन राहिलेलं. काही दुर्मिळ विक्रम वगळता रोज नवे विक्रम रचले आणि मोडले जातात. अशाच एका दुर्मिळ विक्रमाची नोंद चेन्नई सुपर किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सामन्यात झाली. आयपीएल २०६ स्पर्धेच्या ११ व्या सामन्यात



दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात नाणेफेकीचा कौल चेन्नईच्या बाजूने लागला आणि कर्णधार ऋतुराज गायकवाडने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. पण हा निर्णय चुकला म्हणावं लागेल. कारण आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना २५० धावा केल्या. तसेच या धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्स संघ २०७ धावा करू शकला. चेन्नई सुपर किंग्सला या सामन्यात ४३ धावांनी पराभवाचं तोंड पाहावं लागलं. त्याचा परिणाम चेन्नई सुपर किंग्सच्या रनरेटला बसला आणि गुणतालिकेत सर्वात शेवटच्या स्थानी आहेत. निकाल जरी आरसीबीच्या बाजूने लागला असला तरी सरफराज खानने एक विक्रमाची नोंद केली आहे. आरसीबीविरुद्धच्या सामन्यात पावर प्लेमध्ये चेन्नई सुपर किंग्सने तीन विकेट धडाधड गमावल्या.

### तबेला मैदान-श्रमिक जिमखाना हिरक महोत्सवी सोहळा

**मुंबई :** वरळीकोळीवाडा येथील अमरप्रेम क्रीडा मंडळ व सर्व कबड्डीप्रेमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच आमदार सुनील शिंदे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तबेला मैदान-श्रमिक जिमखाना, ना. म. जोशी मार्गचा हिरक महोत्सवी सोहळा साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने पूर्वीचे मुंबई व आताच्या मुंबई शहरच्या सर्व वरिष्ठ पुरुष व महिला गटाच्या संघनायक व संघनायिकेंचा सन्मान करण्यात येणार आहे. मुंबई उपनगरच्या वरिष्ठ गटातील प्रथम संघनायकांना देखील यानिमित्ताने गौरविण्यात येईल. मुंबईची कबड्डी वाढविण्यासाठी ज्या संघटनानी सातत्याने स्पर्धा आयोजन केले अशा आर्य सेवा मंडळ(६१वर्ष), शिवनेरी सेवा मंडळ(५३वर्ष), अमर क्रीडा मंडळ, दादर(४३वर्ष)यांच्या बरोबरीने मातीची क्रिडांगण बनविणारे, ते क्रिडांगण एका हाती सरळ रेषेत आखणारा अशोक गुरव आदींचा सत्कार होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडून बरोबर महाराष्ट्रात गेली तीन तपे वास्तवास असलेली मोनिका बाकरे हिला देखील निमंत्रित करण्यात आले आहे. कबड्डी सलग चार दशकापेक्षा अधिक काळ खेळणारा विलास जाधव, बंगालला टायगर ही उपाधी मिळालेला वसंत सूद, ट्रॉफी बनविणारे हरीश परब, बनियान बनविणारे भुईम्बर आदी मान्यवरांचा सन्मान होणार आहे. कबड्डीच्या कठीण काळात खेळाडूंना वैद्यकीय सुविधा मिळवून देणारे हाड वैद्य, ज्येष्ठ पत्रकार, ज्येष्ठ कबड्डी समीक्षक, सर्वत्र कबड्डी पहाणारे चाहते आदी बरोबर शालेय स्तरापासुन खेळाडूंना मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक आदी मान्यवारांना पाचारण करण्यात आले आहे.

## रांगोळी स्पर्धेत श्रावणी पाटील प्रथम



। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

आज समाजामध्ये भोंदू बाबा मोठ्या संख्येने सक्रिय असून अनेकजण त्यांच्या या भुलथापांना बळी पडत असतात. यातच ते महिलांचे लैंगिक शोषण करीत असतात. मात्र प्रत्येकामध्ये जनजागृती व्हावी या उदात्त विचारातून खोपोली येथे रांगोळी स्पर्धेत श्रावणी रोशन पाटील हिने काढलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधले गेले. जागरूक बना, भोंदूपणाला नाही म्हणा, या स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकाविला.

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे.मात्र याच भूमीत भोंदू बाबा नी कळस गाठलाय आहे. अशोक खरात यांच्याकडे गेलेल्या महिलांचे लैंगिक शोषण केले. याने केलेले दुष्कर्म यामुळे प्रत्येकानी या पासून काही तरी शिकले पाहिजे. मात्र आपल्याला गोड बोलून ते जाळ्यात ओढत असतात. मात्र यापासून सावध राहिले पाहिजे.

श्रावणी रोशन पाटील हिने चार तास अविरत मेहनत घेऊन उत्तम अशी रांगोळी काढली. तिने काढलेल्या रांगोळीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.या माध्यमातून त्याने प्रत्येकाला एक संदेश देऊन समाज जनजागृतीचा पाया रचत आहे. आजवर त्यांनी विविध माध्यमातून रांगोळी काढून अंधश्रद्धा, यावरती तिने समाज प्रबोधन केले त्यांनी काढलेली ही रांगोळी खऱ्या अर्थाने समाजाच्या हिताचे ठरले असून प्रत्येकाने त्यापासून चांगला बोध घेऊन आपल्यामध्ये परिवर्तन करणे गरजेचे आहे. यावेळी प्रथम क्रमांक आलेल्या पाटील ह्यांस सन्मानचिन्ह पैठणी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

## देवघर भंडारी प्रीमियर लीग स्पर्धा

# काळभैरु आरावी संघ प्रथम



। मुरुड । प्रतिनिधी ।

हरिहरेश्वर येथे देवघर भंडारी प्रीमियर लीग पर्व पहिले संपन्न झाले. हनुमान जन्मोत्सव चे औचित्य साधत, श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील भंडारी युवकांचे दोन दिवसाचे क्रिकेटच्या सामन्याचे आयोजन देवघर भंडारी मित्र मंडळ हरिहरेश्वर भंडारी प्रीमियर लीग २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या पर्वामध्ये एकूण १२ संघाने आपला सहभाग नोंदवला होता. यामध्ये प्रथम क्रमांक काळभैरु आरावी संघाने पटकावले. कार्यक्रमाचे उद्घाटन कृष्णकांत साखळे तसेच भंडारी समाजाच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सर्व ज्ञाती बांधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले.

काळभैरू आरावी संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. आई गावदेवी संघ आदगाव द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला. उत्कृष्ट फलंदाज श्रमिक राऊत, उत्कृष्ट गोलंदाज श्रवण लिडकर, मालिकावीर सतीश पाटील यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. उत्कृष्ट समालोचन हरिश दिघीकर व अनुज मोरे या दोघांनी करून कार्यक्रमात आपल्या बहारदार आवाजाने रंगत आणली.

प्रथम आणि द्वितीय पारितोषिक वितरणाकरिता भंडारी समाजाच्या वतीने प्रमुख मान्यवर पांडुरंग तोडणकर, अखंड भंडारी समाज अध्यक्ष रामकृष्ण मांजरेकर, प्रवीण मयेकर, रंजन कोलथरकर, सुकृत कोलथरकर, मंगेश पोलेकर, सागर करदेकर, सुधिर मयेकर, विठोबा (आप्पा) देवकर, सुभाष कोलथरकर, विराट मयेकर यांची उपस्थितीती होती. या पर्वामुळे ग्रामीण भागातील मुलांना क्रिकेटचे एक व्यासपीठ उपलब्ध होऊन भविष्यामध्ये उत्तम क्रिकेटवीर तयार होतील, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

## राज्यस्तरीय बॅडमिंटन प्रशिक्षण शिबीर

**ठाणे :** दादोजी कोंडदेव क्रीडांगणातील खंडू रांगणेकर बॅडमिंटनहॉलयेथेउन्हाळीबॅडमिंटन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. १९ एप्रिलपासून या प्रशिक्षण शिबिराला सुरुवात होणार आहे. १५०हून अधिक राज्य विजेते, ३५पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि १५ शिवछत्रपती पुरस्कार विजेते ही या प्रवासाची ठळक उदाहरणे आहेत. शिस्तबद्ध प्रशिक्षण पद्धती आणि उत्तम सुविधा यामुळे खेळाडूंना दर्जेदार वातावरणात सराव करण्याची संधी मिळते. यंदा शिबिराची रचना तीन भागांत अर्थातच टप्प्यांत करण्यात आली आहे. १९ एप्रिल ते ९ मे २०२६ या कालावधीत बेसिक कॅम्पचा पहिला टप्पा आयोजित करण्यात आला आहे. ११ मे ते ३० मे २०२६ दरम्यान बेसिक कॅम्पचा दुसरा टप्पा पार पडेल.तसेच १९ एप्रिल ते ३० मे या काळात ४० दिवसांच्या ॲडव्हान्स बॅचचे आयोजन करण्यात आले आहे.

## अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बिनविरोध

**पुणे :** महाराष्ट्र राज्य खोखो संघटनेच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. खो-खो राज्य संघटनेचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या सुनेत्रा पवार पहिल्या महिला ठरल्या. म्हाळुंगे बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात रविवारी विशेष सर्वसाधारण सभा झाली. अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर रिक्त झालेल्या अध्यक्षपदी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड करण्याचा निर्णय झाला. या बैठकीसाठी भारतीय महासंघाचे उपाध्यक्ष लोकेश्वरा आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे प्रदीप खांडरे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. बैठकीला सर्व जिल्हा प्रतिनिधींची उपस्थिती होती.

## जय हनुमान चषक क्रिकेट स्पर्धा

# आशीर्वाद क्रिकेट संघ अजिंक्य



। महाड । प्रतिनिधी ।

खुटील हनुमान वाडी, होडबेकोंड येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त जय हनुमान प्रतिष्ठान क्रिकेट संघ यांच्या पुढाकाराने तसेच जय हनुमान मित्र मंडळ मुंबई, पुणे, ठाणे ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ खुटील हनुमानवाडी, होडबेकोंड यांच्या सहकार्याने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण स्पर्धेदरम्यान झालेले सर्व सामने अत्यंत रोमहर्षक ठरले. अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळ करत अटीतटीच्या अंतिम सामन्यात सोनघर संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारले. आशीर्वाद संघाने निर्धारित षटकात विकेट न गमावता २९ धावा करून विजयासाठी ३० धावांचे लक्ष सोनघर संघा समोर ठेवले. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सोनघर संघाने २ षटकात १ बळी गमावून केवळ २९ धावांपर्यंत मजल मारता आली. केवळ १ धावेने आशीर्वाद संघाला विजयी घोषित करण्यात आले.

आशीर्वाद क्रिकेट संघ लोअर तुडील या संघाने विजेतेपद पटकावले, तर हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर हा संघ उपविजेता ठरला. तसेच दत्तकृपा क्रिकेट संघ अप्पर तुडील यांनी तृतीय क्रमांकांवर नाव कोरले. उत्कृष्ट फलंदाजाचा किताब ऋषी भावेने पटकावला तर उत्कृष्ट गोलंदाज साहिल नाकते ठरला. उत्कृष्ट क्षेत्ररक्षक निलेश होडबे आणि मालिकावीर दिपेश बैकर यांनी किताब पटकवला.या क्रिकेट स्पर्धेचे समालोचक दत्तात्रय क्षीरसागर, श्रवन खोपकर यांनी करून खेळाडूंना प्रोत्साहीत केले.

## राज्यस्तरीय निवड चाचणी, अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# रायगडने पटकावला तृतीय क्रमांक



। रोहा । प्रतिनिधी ।

नाशिक येथे पार पडलेल्या ७३ व्या वरिष्ठ गट महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत रायगड जिल्हा संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावले आहे.

या स्पर्धेत जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राज मोरे याचे विशेष योगदान राहिले. राज मोरे याने संपूर्ण स्पर्धेत मजबूत डिफेन्स, चपळ हालचाली आणि निर्णायक क्षणी केलेले सुपर टॅकल यांच्या जोरावर संघाला महत्त्वाच्या सामन्यांमध्ये आघाडी मिळवून दिली. राज मोरे याची कबड्डीतील वाटचाल सातत्यपूर्ण यशाने भरलेली आहे.

कुमार गटात कर्णधार म्हणून दोन वेळा संघाला विजेतेपद मिळवून दिले, ज्यामुळे त्याचे नेतृत्वगुण अधोरेखित झाले. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत २०२५ मध्ये रायगड जिल्हा कुमार गट संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली.

तसेच पुढे त्याने महाराष्ट्र कुमार गट संघात स्थान मिळवत राज्य पातळीवर आपली ओळख निर्माण केली. यासोबतच युवा कबड्डी लीगसाठीही रायगड संघात स्थान मिळवत त्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# मोठीजुईच्या मैदानावर टेनिस क्रिकेट सामने



। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील कोप्रोली येथील चंद्रशेखर मित्र मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आयोजित प्रकाश झोतातील टेनिस क्रिकेट सामन्यातील बापूजी देव चषकाचे भव्य उद्घाटन झी मराठी मोठीजुई येथील भव्य मैदानावर आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे मिलिंद पाडगावकर, डॉ. मनीष पाटील, अविनाश ठाकूर, विनोद म्हात्रे, नितेश पाटील, अलंकार परदेशी, घनश्याम पाटील, ध्रुव म्हात्रे आणि एमजी ग्रुपचे सदस्य, काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पहिल्यांदा सुवर्णपदक जिंकले | इंडियाज मिरॅकल आर्चरची ओळख

# पायलने वर्ल्ड चॅम्पियन शीतलला हरवले



। बँकॉक । वृत्तसंस्था ।

वर्ल्ड आर्चरी पॅरा सिरीजमध्ये भारताने ७ सुवर्ण, ५ रौप्य, ४ कांस्य पदकांसह एकूण १६ पदके जिंकून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. वर्ल्ड नंबर-१ आणि वर्ल्ड चॅम्पियन शीतल देवीला धक्का बसला आहे. महिला कंपाऊंड फायनलमध्ये १८ वर्षीय पायल नागने शीतलला १३९-१३६ ने हरवून सुवर्णपदक पटकावले. एका वर्षाच्या आत शीतलवर पायलचा हा दुसरा विजय आहे. यापूर्वी, तिने जानेवारी २०२५ मध्येही शीतलला हरवले होते. पायलने तिच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच सीनियर गटात आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक जिंकले.

पायल सांगते की, त्या कडू गोष्टींनी तिला तोडले नाही, उलट काहीतरी बनण्याची जिद्द दिली. हात नव्हते, म्हणून पायलच्या आईने तिच्या तोंडात पेन पकडून सांगितले, आता हेच तुझे हात आहेत.पायलने तोंडाने लिहायला शिकले आणि नंतर स्केचिंग सुरू केले. आर्चरीपूर्वी तिने माउथ-पेंटिंगमध्ये राज्यस्तरीय सुवर्णपदक जिंकले होते. पायलच्या आयुष्यात एक वळण तेव्हा आले, जेव्हा तिला न सांगता अनाथाश्रमात पाठवले. तिथे ती घरच्यांसाठी रडत राहिली, पण तेच अनाथाश्रम तिच्या क्रीडा प्रतिभेचे साक्षीदार बनले.

जेव्हा ती पहिल्यांदा कटरा येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये पोहोचली, तेव्हा इतरांना हातांनी धनुष्य चालवताना पाहून निराश झाली होती, पण प्रशिक्षक कुलदीप वेदवान यांनी तिच्या धैर्याला दिशा दिली. पायलने एक अनोखी पद्धत विकसित केली. ती आपल्या प्रोस्थेटिक पायांनी धनुष्य धरते, दातांनी स्ट्रिंग ओढते आणि खांद्याच्या दाबाने बाण सोडते. याच आश्चर्यकारक कौशल्यामुळे शीतलने तिला इंडियाज मिरॅकल आर्चर असे नाव दिले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)